मराठा इतिहासवाङ्मयोत्तेजक मंडळ.

पुणें.

मराठी इतिहासवाङ्मयोत्तेजक मंडळ.

[ १ ]

# अहवाल.

सन १९१७

जानेवारी ते नवंबर

पुणें.

शके १८३९—सन १९१७

किंमत चार आणे.

प्रकाशक—केशवराव भवानराव शिंदे कँट्रॅक्टर जाईंट
सेक्रेटरी म. इ. वा. मंडळ, पुणें संगमाजवळ १५२ सिव्हील
लाइन्स यांनीं पुणें पेठ बुधवार नं १९७ येथील म. इ.
वा. मंडळाचें आफिसांत प्रसिद्ध केलें.

---

मुद्रक—त्र्यंबक हरि आवटे, पुणें, सदाशिव पेठ, घ. नं. १८१
यांनीं पुणें सदाशिव पेठ, घ. नं. १८१ येथील आपल्या
इंदिरा छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

---:०:---

आज आम्हीं मराठा इतिहासवाङ्मयोत्तेजक मंडळाच्या पहिल्या परिषदेचा रिपोर्ट वाचकांस सादर करीत आहोंत. या मंडळाची स्थापना होऊन एकवर्षही पुरें झालें नाहीं तोंच या मंडळाकडून कांहीं विशेष काम झालें असेल अशी अपेक्षा कोणीच करणार नाहीं. सन १९१७ साळांत म्हणजे प्रथम वर्षी फक्त मंडळाच्या कामाची दिशा ठरविण्या पलिकडे फारसें काम झालेलें नाहीं. सातारा येथें नेमण्यांत आलेल्या कमिटीनें मंडळाची साधारण घटना तयार करून अंशतः कामास सुरुवात केली आहे. ठरल्याप्रमाणें "मराठ्यांची गेल्या चारशें वर्षांतील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थिति" या विषयावर लेख मागविलेला असून श्री. खासे-साहेब पवार यांचा एक, रा. रामराव सुभानराव बर्गे यांचा एक, व कर्नल नानासाहेब शिंदे यांचा एक असे तीन लेख 'मराठा' मासिकाकडे प्रसिद्धीसाठीं पाठविले आहेत. यांतील रा. बर्गे यांचा लेख ऐतिहासिक असून दुसरे दोन इतर विषयांवर पण अत्यंत उपयोगी आहेत.

या मंडळाच्या कामाचें महत्त्व घ्यांनीं आणून प्रत्येक गृहस्थानें यास लेखनद्वारा व द्रव्यद्वारा मदत करणें फारच जरूरीचें आहे.

ज्याअर्थी या रिपोर्टांत विशेषतः कार्याची दिशाच जास्त दिसणार आहे त्याअर्थी या रिपोर्टाची हस्तलिखित प्रत वाचून मंडळाचे अध्यक्ष व मराठा समाजांत फार कळकळीनें व उत्साहानें काम करणारे श्री. खासेसाहेब पवार (देवास-ज्युनिअर) यांनीं आमचेकडे पाठविलेल्या सुचना थोडक्यांत या खालीं देऊन आम्ही ही प्रस्तावना पुरी करितों.

" या मंडळाचें काम सुरळीतरीतीनें व झपाट्यानें चालण्याकरितां एका गोष्टीची अतिअवश्यकता आहे; ती ही कीं, एखाद्या मराठा सद्गृहस्थानें एखादा लेख किंवा ग्रंथ मराठा इतिहाससंबंधानें लिहिला पाहिजे व तो अशा प्रकारचा असावा कीं जो सर्वपरी विद्वानांमध्यें व मराठाज्ञातीमध्यें मान्य झाला पाहिजे. असें झाल्याशिवाय

या मंडळामध्यें किंवा त्यांच्या स्तुत्य खटपटीमध्यें लोकांची श्रद्धा बसणार नाहीं; आणि जों पावेतों अशी स्थिती प्राप्त होणार नाही तों पावेतों या मंडळाच्या उद्दिष्ट सत्कार्यामध्यें फलप्राप्ती होणें दुर्लभ आहे.

आपल्या ज्ञातींतील लोकांची सांपत्तिक स्थिती दुर्बल असल्या-मुळें ग्रंथ तयार करण्याकडे वेळेचा व्यय करण्याचें सामर्थ्य त्यांच्या आंगीं नसतें. सबब ह्या उद्योगाकडे लोकांचें मन वळविण्याकरितां जें पारितोषिक ठेवावयाचें त्याचें प्रमाण आपण ठरवावें. आपण या मंडळाचें नांव इतिहास वाङ्मयोत्तेजक ठेविलें आहे परंतु वाङ्मयोत्तेजनांत कांहीं उपक्रम झाल्याचा किंवा करण्याचा रिपोर्टांत किंवा ठरावांत कोठेंही माझ्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. याजबद्दल माझी सूचना पुढील प्रमाणें आहे:—

प्रतिवार्षिक परिषदेच्यावेळीं एखादी व्याख्यानमालेसारखी व्यवस्था निर्माण करण्यांत यावी. तत्संबधी विचार करितांना कांहीं तरी विवक्षित मंडळींनां ही सूचना करून प्रत्येकांनीं आपआपले विषय ठरवून घ्यावे व त्याजवर भाषण व विवेचन परिषदे-च्यावेळीं करण्यांत यावें. याजकरितां तीन वार्षिक पारितोषिकें ठेविण्यांत यावींत.

रिपोर्टांतील ठराव वाचिले. पहिल्या ठरावासंबंधानें माझी सूचना अशी आहे कीं, या संस्थेचे फिरते संशोधक व मराठा-परि-षदेचे फिरते उपदेशक या दोघांची हीं कामें एकाच माणसानें करावीं ह्मणजे पैसा व वेळ यांचा विनाकारण व्यय होणार नाहीं, व जनसमूहाला या दोन्ही व्यक्तींच्या वेगवेगळ्या भेटी कंटाळवाण्या होण्याचा जो संभव आहे तो उपस्थित होणार नाहीं.

, ठराव दुसरा यांतील शिष्यवृत्त्या ज्या शर्तींवर दिल्या जाणार आहेत त्यांत एक अट आणखी नमूद करण्यांत यावी असें माझें मत आहे. ती शर्थ ही कीं, अशा प्रत्येक व्यक्तीनें इतिहासावर कांहीं तरी लेख लिहून मंडळास अर्पण करावा. ठराव नंबर चार मध्यें रा निळकंठराव देशमुख यांनीं केलेल्या सूचनेस अनुमोदन देतांना रा. लक्ष्मण बापूजी शिंदे यांनीं ह्मटलें आहे कीं कमेटींतील

सभासद इतिहास व वाङ्मय यांची अभिरुचि असणारे असेच असावेत; निदान ज्यांना या विषयांसंबंधीं सहानुभूति आहे असे तरी असावेत. फक्त पुढारी या दृष्टीनें सभासद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं; हें त्यांचें मत विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

ठराव पांच या संबंधीं विचार करावयाचा म्हणजे प्रस्तुतकालीं कांहीं वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें मराठ्यांच्या संपादकत्वाखालीं चालू आहेत परंतु त्यांची स्थिती सर्व दृष्ट्या समाधानकारक नाहीं. सगळ्यांत मोठी अडचण म्हणजे पैशांची आणि ती सर्वसामान्य आहे आणि जेथें ही नड तेथें सर्वच नडी उपस्थित होतात. या धंद्यांतील सद्गृहस्थांचें संगनमत होऊन प्रथक प्रथक खटपट करणें सोडून एकीकरण जाहल्यास मराठा चालकत्वाखालीं वर्तमान पत्रांना व आपल्या ज्ञातीला विशेष फायदा झाल्यावांचून राहणार नाही हें उघड आहे. मराठा ज्ञातींतील पुढारी लोकांनीं सुद्धां प्रचलित असलेल्या पत्रांतून जें सर्वांमध्यें चांगलें ठरेल त्याला आश्रय द्यावा म्हणजे बाकीचीं पत्रें हळू हळू आश्रयाभावामुळें गळून पडतील, किंवा स्वतःला चांगली खटपट करून लोकमताप्रमाणें सुधारून घेतील.

ठराव सहा यासंबंधीं एक विशेष सूचना अशी आहे कीं इतिहासवाङ्मयोत्तेजक मंडळाच्या कचेरीमध्यें इतरत्र अशाच उद्देशानें स्थापन जाहलेल्या संस्थेचे नियम अहवाल वगैरे जमा करून मंडळाच्या सभासदांच्या माहितीकरितां व उपयोगाकरितां ठेविले जावेत.

माझ्यामतें इतिहासवाङ्मयोत्तेजक मंडळाची प्रतिवार्षिक सभा मराठाशिक्षणपरिषदेच्या वेळेसच ठेविली जावी म्हणजे लोकांचा समूह असून मंडळीना येण्याजाण्याचा खर्च वगैरे गैरसोय होणार नाहीं. तूर्त मला ज्या सूचना आठवल्या त्या मी केल्या आहेत त्याचा मंडळाला कांहीं उपयोग होईल अशी आशा करतों."

ता० १-१२-१७.

गो. ह. साळवी.
सेक्रेटरी म. इ. वा. मंडळ पुणें.

# मराठा इतिहासवाङ्मयोत्तेजक मंडळ.

## बैठक १ ली.

### पुणें.

#### दिवस १ ला.

सातारा येथें १९१६ डिसेंबरमध्यें भरलेल्या मराठा शिक्षण-परिषदेंत स्थापन झालेल्या मराठा इतिहासवाङ्मयोत्तेजक-मंडळाची पहिली परिषद् ता. २६–५–१७, शनिवार रोजीं पुणें लष्कर, बंगला नं. २००८ येथें मुद्दाम उभारलेल्या तंबूंत बडोद्याचे रा. माधवराव शितोळे, बी. ए., बॅरिस्टरॲट-लॉ, एम् आर्. ए. सी., यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

परिषदेस ठिकठिकाणचीं बरीच सुशिक्षित मराठे मंडळी हजर होती. त्यांत रा. जयरामराव सावंत, एल्. सी. ई., रा. काशिनाथ रामकृष्ण कोरगांवकर, बी. ए., एल्. एल्. बी., रा. वंडेकर, रा. केळुसकर, रा. रोकडे, जे. पी., रा. रावबा थोरात, रा. रामराव शिंदे, बी. ए, रा. नीळकंठराव देशमुख, रा. गोविंदराव सासणे, रा. कालेकर, रा. भगवंतराव पाळेकर, रा. पांडुरंग चिमणाजी पाटील, एल्. एजी., प्रो. माटे, एम. ए., डॉ. खेडकर एम. डी., रा. लक्ष्मणराव शिंदे बी. एजी., रा. गं. मुं. काळभोर, रा. नरहरबोवा शिंदे, रा. बापूराव शिंदे, रा. लक्ष्मणराव ठोसर, रा. त्रिंबक हरी आवटे, रा. विठ्ठल रामजी शिंदे बी. ए., श्री. सौ. गगूबाई खेडकर, श्री. सौ. गजराबाई माटे, श्री. सौ. रखमाबाई शिंदे, श्री. सौ. मथुराबाई शिंदे, श्री. सौ. आनंदीबाई शिर्के, व इतर बरीच मंडळी हजर होती.

सुमारें अर्धा तास अध्यक्षांचें भाषण झालें त्याचा सारांशः—

" जरी माझें स्वतःचें इतिहासासंबंधीं विशेष अध्ययन झालें नाहीं, तरी ज्या मराठा जातीमध्यें माझा जन्म झाला आहे तिनें अल्प काळापूर्वी महाराष्ट्राची व सर्व भरतखंडाची कीर्ति अजरामर करून ठेविली आहे; ह्या गोष्टीचा सद्‌भिमान माझ्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूमध्यें वावरत आहे. म्हणून आपण नुकतेंच जें हें मंडळ काढलें आहे त्याबद्दल सर्व मराठ्यांच्या व त्यांच्या हितचिंतकांच्या वतीनें मी आपलें मनःपूर्वक अभिनंदन करितों.

ब्रिटिश राज्याच्या शांतिछत्राखालीं बरेच दिवस घालविल्यामुळें आतां तरवारीची कारकीर्द संपून लेखणीचेंच ह्यापुढें सवत्र निर्भेळ साम्राज्य चालणार असें ह्या देशांत राहणाऱ्या बहुतेकांना वाटूं लागलें होतें. पण हल्लीं चालू असलेल्या महायुद्धामुळें ही समज पालटून पुनः तरवार आमचे डोळे दिपवूं लागली आहे व सूर्यचंद्राप्रमाणें ती नेहमींच तळपत राहणार अशीं चिन्हें दिसत आहेत. चालू युद्धांत मराठे वीरांनीं आपला प्रताप जगजाहीर केल्यानें इंग्रज बहादूरही मराठ्यांचा जयजयकार गाजवूं लागले आहेत. अशा स्फूर्तीच्या काळीं आम्हांला आमच्या पूर्वजांच्या कृतीची आठवण होणें अगदीं साहजिक आहे. ती न झाली तरच मोठें आश्चर्य म्हणावयाचें. प्रसंगविशेषीं अशी आठवण करून तृप्त न राहतां आमचे पूर्ववृत्तावें संशोधन करून तें अधिकारी माणसांकडून यथासांग लिहून काढण्याची सुरुवात करण्याला हल्लींचा मुहूर्त फारच शुभ आहे ह्यांत शंका नाहीं. आणि अशा कामीं इतरांच्या तोंडाकडे पहात न बसतां आमच्यांतील विद्वानांनींच कंबर बांधून पुढें आलें पाहिजे. कलमबहादुरीमुळें आमच्या तरवारबहादुरीला कमीपणा मुळींच येणार नाहीं. उलट तरवारीची कामगिरी भावीपिढीच्या अंतःकरणपटावर कायमची कोरून ठेवण्याला लेखणीची जरूरी आहे.

शिवाय मानवीसमाजाची इतिकर्तव्यता तरवारीच्याच धारेवर सर्वस्वीं अवलंबून आहे असें नाहीं. विद्या, व्यापार, कला, शिष्टाचार, धर्म आणि नीति इत्यादि विविध विषयांमध्यें प्रगति होण्याला वाङ्मयाचीच आवश्यकता आहे. त्या वाङ्मयाची सं-

पादुर्गी करण्याची जबाबदारी आमच्यांतील शिकलेल्या मंडळावरच विशेषतः राहणार. ह्या मंडळाच्या प्रवर्तकांनीं सातारा येथील मराठा-शिक्षणपरिषदेपुढें सांगितल्याप्रमाणें शाळा व कॉलेजें यांतून विशिष्ट व्यक्तींना शिक्षण देण्याचें काम गेल्या दहा वर्षांत झाल्यावर ओघानेंच पुढची पायरी ह्मणजे अशा शिकलेल्या व्यक्तींकडून सर्व समाजाला जागृत करण्याकरितां योग्य अशा विविध वाङ्मयाची आणि विशेषतः इतिहासवाङ्मयाची वाढ करणें ही होय ह्मणजे प्रस्तुतचें मंडळ हें मराठाशिक्षणपरिषदेचें पहिलें आणि अत्यंत महत्वाचेंच फळ समजावयास कांहीं हरकत नाहीं. हें आणि अशीं इतर फळें योग्यवेळीं न आल्यास शिक्षण परिषदेनें भावी आयुष्य वांझपणांत घालविल्याची आपत्ति परिषदेवर येईल अशी भीति आहे.

ह्या मंडळाच्या कामाला व्यवस्थितपणानें सुरुवात होण्याला भरपूर द्रव्यसाहाय्य देखील पाहिजे.

ह्याकामीं आमच्या राजेरजवाड्यांनीं सढळ हातानें पुढें आलें पाहिजे. मंडळाच्या माहितीपत्रकावरून तुम्हा सर्वांच्या लक्ष्यांत येईल का, मंडळाचें मध्यवर्तीदप्तर ( Central Bureau ) स्थापन व्हावयाचें आहे. हें दप्तर म्हणजे ह्या मंडळाचा आत्माच ह्मणावयाला हरकत नाहीं. तें जोंपर्यंत पूर्ण जोरांत संघटित होणार नाहीं, तोंपर्यंत मंडळाचें सर्व कार्य स्वप्नसृष्टींतच राहणार. असें दप्तर उघडणें ह्मणजे फारच जबाबदारीचें व जोखमीचें काम आहे. आमच्यांतील प्रमुख संस्थानाधिपतींनीं अभयदान दिल्याशिवाय मंडळाला ही जोखीम शिरावर घेतां येणार नाहीं.

मंडळाचे उद्देश माहितीपत्रकांत अत्यंत स्पष्टरीतीनें नमूद करण्यांत आले आहेत, ह्याबद्दल मी कमिटीचें अभिनंदन करितों. हें पत्रक सहज वाचून काढल्याबरोबर मंडळाच्या मनांत कायकाय करावयाचें आहे ह्याचा वाचणाऱ्याच्या मनांत चक्क प्रकाश पडतो; आणि पूर्वीं कधींहि न आलेले विचार व आशा ह्यांच्या लाटा वाचकाच्या मनांत उचंबळूं लागतात. हें माहितीपत्रक म्हणजे निजलेल्या मराठ्यांची जागवणूक व जागे असलेल्यांचें नेत्रांजन असें निदान मला तरी

वाटत आहे. पण त्या अंजनामुळें मराठा समाजावरील विशेषतः त्यांतील कुलवान आणि धनवान् मंडळींची जबाबदारी फार वाढली आहे. अंजन घालण्यापलीकडे विद्वान मंडळी काय करणार! अंजन घालून घेतल्यावरही जर समाज गाढ झोंपेंत गुंग झाला तर मग काळझोंपच समजावयाची.

मी ह्यापेक्षां ज्यास्त कांहीं सांगून आपला वेळ घेत नाहीं. मंडळाचे योग्य अधिकारी आपल्यापुढें मुख्य मुख्य विषयांचा सांगोपांग विचार करणारच आहेत. ही परिषद् पहिलीच असल्यामुळें आम्ही सर्वांनींच मिळून आपापल्या विचारांचा व अनुभवांचा फायदा परपस्परांस देऊन मग कार्यारंभ करावयाचा असा ह्या परिषदेचा हेतु आहे. म्हणून प्रत्येकानें केवळ ऐकून स्वस्थ न राहतां आपल्याला जर एखादी नवीन कल्पना सुचत असेल किंवा महत्वाची मदत करतां येत असेल तर ती परिषदेपुढें सादर करावी अशी मी अंतःकरणपूर्वक विनंति करितों.

दुर्दैवानें आमच्या देशांतील भिन्न भिन्न जातींमध्यें असावा तितका सलोखा, सुधारणेच्या व शांततेच्या काळाचा इतके दिवस उपभोग घेऊनही दिसून येत नाहीं.

हें नवीन मंडळ केवळ मराठा जातीचेंच घोडें पुढें दामटण्यासाठीं निर्माण झालेलें नाहीं हें मी खास आणि आग्रहानें जाहीर करितों. मंडळाचे माहितीपत्रकांतील शेवटचे उद्गार वाचून माझ्याप्रमाणेंच इतर कोणाही निर्विकार मनाच्या माणसाची खात्री पटेल अशी मी उमेद् बाळगून आहे. मंडळ इतर सर्वांच्या मदतीची व सहानुभूतीची अपेक्षा करीत आहे व ती स्वीकारण्यास तयार आहे; सहकार्य करण्यास आतुर आहे. इतकेंच नव्हे तर मंडळाच्या कार्याचा असा कोणताहि भाग नाहीं कीं, ज्याचा प्रत्यक्ष अथवा पर्यायानें शुभ परिणाम सर्व राष्ट्राच्या सामान्य हितावर होणार नाहीं. थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे मंडळाचें कार्य हें राष्ट्रकार्य आहे. "

नंतर म. इ. धा. मंडळाचे चिटणीस रा. साळवी बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं रिपोर्ट वाचून दाखविला, त्याचा सारांशः--

" मराठाशिक्षणपरिषदेनें मराठा वर्गाच्या शिक्षणासाठीं आज सुमारें १० वर्षे जें काम केलें आहे त्याचें एक फळ मराठा इति-

हासवाङ्मयोत्तेजक मंडळ हें होय हें सांगण्यांत मला मोठा अभिमान वाटतो. परिषदेच्या ८ व्या बैठकीच्या वेळीं मे. जयराम जनार्दन सावंत एल्. सी. ई., ई. ई. जपान व त्यांचे कांहीं स्नेही यांच्या मनांत कांहीं मंडळींची एक कमिटी करून त्यांतील प्रत्येक सभासदानें मराठा वर्गाच्या उन्नतीसाठीं निदान एक उत्तम लेख दरसाल तयार करून तो कमिटीतर्फे प्रसिद्ध करावा अशी कल्पना आली होती; परंतु तिला मूर्त स्वरूप देण्यांत आलें नव्हतें. या नंतर कांहीं महिन्यांनीं पुन्हां याच गोष्टीबद्दल मुंबईचे मि. शिवराम सखाराम शिर्के, बी. ए. व मि. रामराव गोविंदराव शिंदे बी. ए. यांनीं आपल्या कांहीं मित्रमंडळीमध्यें असली एखादी संस्था काढण्याबद्दल खटपट चालविली होती. परंतु त्यासही म. शि. परिषदेच्या सातारा येथील दहाव्या बैठकीच्या वेळेपर्यंत मूर्त स्वरूप आलें नाहीं. सातारा येथील परिषदेच्या बैठकीच्या वेळीं ह्या मंडळाच्या कमिटींत अत्यंत उत्साहानें काम करीत असलेले मे. विठ्ठल रामजी शिंदे बी. ए. यांनीं आपल्या भाषणांत मराठा वर्गाच्या उन्नतीविषयीं बोलतांना आपणांत वाङ्मयाची अभिरुचि जितकी असावयास पाहिजे तितकी नाहीं, इतकेंच नव्हे तर वाङ्मयाकडे दृष्टी फेंकली असतां मराठा वर्गाची ह्या संबंधानें एक तऱ्हेची अनास्था स्पष्ट दिसून येत आहे हें तेथें जमलेल्या मंडळींच्या नजरेस आणिलें. मे. शिंदे यांनीं त्याचवेळीं असेंहि प्रतिपादन केलें कीं, मराठा वर्गास आपल्या इतिहासाबद्दल कळकळ असणें अत्यंत अवश्य आहे व ऐतिहासिक वाङ्मयाकडे त्यांचें लक्ष्य वेधणें जरूरीचें आहे.

त्याचा परिणाम श्रोतृवृंदावर चांगला होऊन मे. भाऊसाहेब गायकवाड यांनीं मराठा समाजांतील लेखकांकडून ऐतिहासिक विषयावर लेख मागवून सर्व लेखांत उत्तम लेख ठरेल त्यास बक्षीस देण्यासाठीं रुपये ५० देण्याचें कबूल केलें. त्याबद्दल मे. खासेरावसाहेब जाधव यांनीं जमलेल्या मंडळीस माहिती देऊन सदरची रकम वाढविण्याच्या उद्देशानें थोडेंसें भाषण केलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, थोडक्याच वेळांत सुमारें दोन हजारांचे आंकडे पडले. श्री. बाबासाहेब पवार ( देवास छोटी पाती ) यांनीं १५१ रुपये

देण्याचें कबूल केलें. व एवढी रकम एका विषयावरील लेखासाठींच खर्च न करतां त्याचा विनियोग इतिहास आणि वाङ्मय याबद्दल आपल्या समाजांत गोडी उत्पन्न करण्याकडे करण्यांत यावा असें ठरलें. मराठा समाजांत ३।४ वर्षें घोळत असलेल्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्यांत आलें; आणि श्री. खासेसाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटीही या कामाकरितां नेमण्यांत आली. सदरहू कमिटीचे सभासद मे. खासेरावसाहेब जाधव, मे. भाऊसाहेब गायकवाड, मे. बाजीराव साहेब काटे, मे. गोपाळराव दळवी व मे. विठ्ठल रामजी शिंदे हे असोन खजीनदार श्री. सरदार बाबासाहेब घोरपडे हे आहेत व या कमिटीच्या चिटणिसाचें काम मी करावें अशी आज्ञा झाली आहे. हीच मराठा इतिहासवाङ्मयोत्तेजक मंडळाची मूळ स्थापना होय.

## मंडळाचें उद्दिष्ट.

या मंडळाचें नामाभिधान झाल्यावर त्याचे उद्देश ठरविण्यांत आले. ते मंडळाचें उद्दिष्ट परिशिष्ट 'ब' मध्यें दिले आहेत.

## नामाभिधान व उद्दिष्ट या संबंधीं विचार.

कोणत्याही संस्थेचें नांव ठरवितांना उद्देश डोळ्यापुढें ठेवणें अवश्य असतें. म्हणून सर्व साधारणपणें जरी नांव प्रथम दाखल करणें इष्ट असतें तरी वास्तविकपणें उद्दिष्टच प्रथम आंखून घेणें जरूर असतें. या संस्थेचें नांव मराठा ऐतिहासिक वाङ्मयोत्तेजक मंडळ असें ठेवावें अशी कल्पना अगदीं प्रथम आलेली होती. परंतु मराठा वर्गाची स्थिति, या वर्गाचें शिक्षण व आचारविचार या गोष्टींचा विचार करतां या मंडळानें केवळ ऐतिहासिक वाङ्मयाचीच कामगिरी हातांत घेणें अपुरें होईल असें वाटूं लागलें. मराठा वर्गांत शिक्षणाचा प्रसार व्हावा तितका झाला नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. मराठा वर्गास शिक्षणाची गोडी आतां कोठें थोडी लागली आहे. या वर्गास शिक्षणाच्या बाबतींत उत्पन्न होणारे अडथळे अद्याप समूळ नाहींसे झाले नाहींत. मराठा समाजांत जे थोडे शिकलेले लोक आहेत, त्यांपैकीं बऱ्याच लोकांना आपल्या बांधवांच्या शिक्षणासाठीं कांहीं प्रयत्न केले पाहिजेत ही गोष्ट जरी

समजत आहे तरी दुर्दैवानें त्याच्या प्रसारासाठीं पुढ येण्याचे मार्ग दिसत नाहींत. मराठाशिक्षणपरिषदेच्या कामासाठीं अहर्निश तर नाहींच नाहीं, परंतु वर्षांतून कांहीं दिवस तरी झटण्यास तयार असलेल्या आमच्या शिकलेल्या बांधवांची संख्या फारच अल्प आहे. मराठा समाजामध्यें शिक्षणाच्या अभावामुळेंच अद्याप प्रगति झालेली नाहीं. मराठा वर्गाचे आचारविचार सुधारले पाहिजेत. पडद्याची अपायमूलक चाल, बालविवाह, हुंडा घेण्याची अनिष्ट पद्धत, मनाचा कोतेपणा दर्शविणारे जातिभेदासारखे प्रकार वगैरे गोष्टींसंबंधानें मराठा समाजानें आपल्याकरितां म्हणून विचार करणें जरूर आहे. म्हणून मंडळाच्या नामाभिधानासंबंधांत इति॰ हासास वाङ्मयाचीहि जोड देण्यांत आली आहे.

## कमिटिचें आजपावेतोंचें काम.

या मंडळाच्या दोन शाखा एक नागपूर येथें व दुसरी उमरावती येथें स्थापन करण्यांत आलेल्या आहेत.

या दोन्ही शाखांचें जनकत्व मराठा शिक्षणपरिषदेचे सन्माननीय जॉइंट सेक्रेटरी मि. निळकंठराव देशमुख यांजकडेच विशेषतः येतें. पुणें येथें आपल्या मंडळाच्या स्थापनेपूर्वी सुमारें ६।७ वर्षें स्थापन झालेल्या भारत-इतिहास-संशोधक मंडळीच्या चिटणीसांची भेट घेऊन त्या संस्थेबद्दल माहिती मिळवून सदरहू संस्थेचे कांहीं रिपोर्ट वाचून त्यांच्या कामाची माहिती कमिटीच्या इच्छेप्रमाणें करून घेण्यांत आलेली आहे; व या मंडळाशीं भारत-इतिहास-संशोधक मंडळाचें सहकारित्व कसें करतां येईल या बाबतींत या कमिटीनें विचार चालविला आहे.

उद्देश ठरवून उद्देशपत्र छापून निघत असतांनाच आपले उद्देश सफल होण्यासाठीं कोणकोणते उत्तम उपाय योजावे याचा विचार कमिटी करीत होती. कमिटी ठरवीत असलेले मार्ग सुलभ व्हावे म्हणून त्या ल ऊहापोह मराठा वर्गांतील सुशिक्षित व इतिहास आणि वाङ्मय यांची गोडी असणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या देखत व्हावा अशी कल्पना कमिटीच्या व कमिटीच्या इच्छेप्रमाणें कमिटींतील वादविवादांच्या वेळीं हजर राहून आपलीं मतें देत असलेल्या हित॰

चितकांच्या मनांत आली. आरंभीं जेव्हां ही कल्पना उत्पन्न झाली, तेव्हां या बाबतींत कांहीं निवडक मंडळींना आमंत्रण करून त्यांचेच विचार या बाबतींत घेणें हितावह वाटलें. परंतु या कल्पनेवर वेळोवेळीं जो ऊहापोह झाला त्याचा परिणाम असा झाला कीं, एक लहानशी परिषद् भरवावी आणि त्या परिषदेपुढें आपणांस पूर्वीच सादर केल्याप्रमाणें कार्यक्रम ठेवावा असें ठरविण्यांत आले. व त्याप्रमाणें या परिषदेचीं आमंत्रणें व उद्देशपत्रकें पाठविण्यात आलीं व आजची ही परिषद् भरविण्यांत आली आहे.

## फंड.

अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे जर या मंडळाचें कार्य जोरानें व व्यवस्थित रीतीनें चाललें पाहिजे तर या मंडळाच्या हातीं बराच पैसा पाहिजे आहे.

ज्यावेळीं हें मंडळ अस्तित्वांत आलें त्यावेळीं देणगी रुपानें रु. १९४३०॥ इतक्या रकमेचीं वचनें मिळालेलीं आहेत व त्यांपैकीं आज पावेतों रु० २६९८१ इतकीच रक्कम वसूल झालेली आहे. या मंडळाचें काम व्यवस्थितपणें करण्यासाठीं, वर्गणी गोळा करण्यासाठीं व अन्य तऱ्हांनीं मंडळाचे उद्देश सफल करण्यासाठीं एक पगारी कामगार नेमण्यांत यावा अशी कल्पना आली असून तसें करण्याचें कमिटीनें ठरविलें आहे; परंतु अद्याप केवळ रकम असावी तितकी हातीं नसल्यामुळें तसें करतां आलें नाहीं. देऊं केलेल्या सर्व रकमा अद्याप हातीं न आल्यामुळें कमिटीच्या मर्जीप्रमाणें सुद्धां कामांत प्रगति करतां आली नाहीं. आपण सर्वांनीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, मंडळाच्या हातीं पैसा नसेल तर मंडळाकडून काम होणें अशक्य आहे व म्हणून प्रत्येकानें आपण देऊं केलेल्या रकमा पाठवूनच थांबूं नये, तर आपल्या स्नेह्यांकडून त्यांनीं देऊं केलेल्या रकमा गोळा करून पाठविण्याची तजवीज करावी व ज्या योगें मंडळाचा फंड अधिक अधिक वाढेल ते सर्व उपाय यो-जावेत अशी त्यांना आमची विनंति आहे.

## मंडळाच्या कार्याच्या सफलतेसाठीं प्रथम काय काय केलें पाहिजे ?

कोणत्याहि संस्थेच्या कामाची सफलता त्या संस्थेच्या काम-

कर्त्या माणसांवर व त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीवर अवलंबून असते. आपलें म. इ. वा. मंडळ त्यास कांहीं अपवाद होऊं शकत नाहीं. जर या मंडळास आपला सर्व वेळ खर्च करणारे, उत्साही, हुशार व शहाणे तरुण सुशिक्षित मराठे गृहस्थ मिळाले नाहींत तर या मंडळाच्या हातून कांहीं काम होईल कीं काय याची मला शंका वाटते. मजसारखे ऑनररी चिटणीस या कामास फारसे उपयोगी आहेत असें मला वाटत नाहीं. तुम्हांस खरें यश संपादन करणें असेल तर आपला सर्व वेळ खर्च करणारा असा एखादा मराठा होतकरू व हुशार गृहस्थ या मंडळाचा चिटणीस झाला पाहिजे व त्यानें या मंडळाचें काम आपलें मुख्य ध्येय केलें पाहिजे. मी म्हणतों या गोष्टीची सत्यता आपणास पटत नसेल तर मी आपल्यापुढें डिप्रेस्ड क्लासमिशनचेंच उदाहरण ठेवितों. मि. शिंदे व मि. सय्यद यांचेसारखे कांहीं गृहस्थ त्या कामास आपणास सर्वस्वी वाहून न घेते तर त्या कामास सध्यां जें स्वरूप आलें आहे तें खात्रीनें आलें नसतें. तुमचा चिटणीस कितीहि शिकलेला असो, त्याचें समाजांत कितीही वजन असो, तो कितीहि दक्षतेनें व उत्साहानें काम करण्यास तयार असो, त्याचे हात जर इतर कामांनीं जखडलेले असतील तर या कामाकडे यावें तसें लक्ष तो देऊं शकणार नाहीं. मी सध्यां आपण नेमलेला चिटणीस आहें व म्हणूनच मी आपल्या अनुभवानें या गोष्टी आपणांपुढें स्पष्टपणें मांडीत आहें. आज आपणांपुढें जे ठराव मांडण्यांत येणार आहेत, यांत एक किरत्या संशोधकाच्या नेमणुकीबद्दलचा आहे. जर आपणांपैकीं १।२ माणसें असे संशोधक म्हणून पुढें येतील व अशा माणसांना अल्प स्वल्प देणगी देऊनही त्यांच्याकडून चिटणीसाचें काम करून घेतां येईल तर तें चांगलें होईल असें मला वाटत नाहीं. कारण अशा माणसांना मंडळाच्या उत्कर्षासाठीं अहोरात्र झटणें हेंच आपल्या आयुष्याचें काम करून घेणें शक्य व रास्तही आहे. तसेंच मराठ्यांचा इतिहास व वाङ्मय यांचा प्रसार करण्यासाठीं जर आपण हें मंडळ स्थापन केलेलें आहे, तर या दोन्ही विषयांचा मुद्दाम अभ्यास करणारे कांहीं विद्यार्थी हातीं घेणें अगदीं अवश्य आहे. कारण तसें केल्याखेरीज या मंडळाच्या कामासाठीं

असणारीं माणसें आम्हांस मिळणें कठीण जाईल. ज्या वेळीं हें मंडळ अस्तित्वांत येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं त्याच वेळीं आपणांस या मंडळांत काम करणारे लोक व या मंडळाच्या उद्देशाप्रमाणें लिहिणारे लेखक कितीसे मिळतील याबद्दल बराच संशय उत्पन्न होऊन असें मंडळ आजच्या मराठावर्गाच्या स्थितींत स्थापन करणें कितीसें इष्ट आहे हा एक प्रश्न उद्भवलेलाच होता. ही मोठीच अडचण आमच्या या मंडळाच्या कामांत येणार आहे, ही गोष्ट खरी आहे व ती दूर करण्यासाठीं आम्ही कांहीं विद्यार्थ्यांना इतिहास व वाङ्मय हे ऐच्छिक विषय मुद्दाम घेण्यास लावून त्यांना त्यासाठीं विशेष शिष्यवृत्त्या मिळतील अशी तजवीज केली पाहिजे. मग ती या मंडळाच्या फंडांतून शक्य तर करा, अगर दुसऱ्या कोणत्याही फंडांतून करा.

म. इ. वा. मंडळाची नियमबद्ध रचना लवकरच करण्यांत येईल हें मी आपणांस आश्वासन देतों. ही रचना करतांना अल्प प्राप्तीच्या आपल्या बांधवांनासुद्धां आपल्या मंडळाचे सभासद होतां यावें हें तत्व नजरेसमोर ठेवण्याचा आमचा विचार आहे. म. इ. वा. मंडळाचे उद्देश व भारत इ. सं. मंडळाचे उद्देश जवळ जवळ ठेवले तर असें दिसून येईल कीं, या दोन मंडळाच्या कामांत बरीच भिन्नता असणार आहे.

## भारत इ. सं. मंडळाचे उद्देश.

१ भारतवर्षासंबंधी ऐतिहासिक साधनें आणि इतर ऐतिहासिक महत्वाच्या वस्तु जमा करणें व संरक्षिणें. २ त्याकरितां इमारती उभारणें. ३ तीं प्रसिद्ध करणें व ऐतिहासिक संशोधनाचें कार्य आरोवण्याजोगें इतर ग्रंथ प्रसिद्ध करणें. आणि ४ हिंदुस्थानच्या इतिहासासंबंधीं संशोधन व त्याचा चिकित्सापूर्वक अभ्यास जेणेंकरून वाढेल व उत्तेजित होईल असे उपाय करणें हे आहेत.

आमच्या मंडळाचे उद्देश परिशिष्ट ब मध्यें दिले आहेत. इतिहासाच्या बाबतींत त्या मंडळाचें काम इतिहास आणि जुनें वाङ्मय यांचें संशोधन व संपादन करण्याचें आहे. तें काम फारच विस्ताराचें व मोठें आहे. या मंडळाचें काम नियमित म्हणजे फक्त मराठा वर्गाच्या इतिहासापुरतेंच आहे. त्या मंडळांत इतिहासाचे-

रीज दुसऱ्या कसल्याही कामास उत्तेजन दिलेलं नाही. पण या मंडळांत मराठ्यांमध्यें सर्व प्रकारचे चांगले नवे लेखक उत्पन्न व्हावेत म्हणून व मराठा वर्गाच्या सुधारणेसाठीं प्रयत्न व्हावेत म्हणून विशेष लक्ष मुद्दाम दिलेलें आहे. त्या मंडळांत मुख्यतः भारत इतिहासाच्या संशोधनास ज्यास्त महत्व दिलेलें आहे; या मंडळांत मराठ्यांच्या इतिहासावरील उत्तम लेखांस ज्यास्त महत्व दिलेलें आहे. असें दोन्ही मंडळासंबंधानें विचार करणाऱ्याच्या सहज ध्यानांत येईल. या दोन्ही मंडळांचा एक दिशेचा प्रयत्न एकच आहे. तो मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें प्रकाशित करणें व जपून ठेवणें हा होय. ज्याअर्थी उभय मंडळांचा हा विषय एक होत आहे त्याअर्थी या दोन्ही मंडळांनीं या बाबतींत परस्परांना त्या विषयावरील परस्परांचीं साधनें मोकळीं ठेवणें उभय मंडळांच्या उद्देशांच्या सफलतेसाठीं जरुरीचें आहे, व यासाठीं या दोन मंडळांमध्यें चांगला सलोख्या असणें व परस्परांनीं परस्परांस सहाय्य करणें अवश्य आहे. या गोष्टीबद्दलचा विचार कमिटीनें केलेला आहे व उद्यांच्या कार्यक्रमांत कमिटीनें यागोष्टीचा चांगला विचार करण्यासाठीं मुद्दाम भा. इ. सं. मंडळाच्या प्रतिनिधीबरोबर आपल्या या परिषदेच्या सभासदांची सहविचारिणी मिश्र सभा भरवून आणण्याचें योजिलें आहे.

## आभारप्रदर्शन.

मला सांगावयाचें सर्व सांगून आटपलें आहे. परंतु ही परिषद यशस्वी होण्यासाठीं ज्या ज्या बंधुभगिनींनीं व संस्थांनीं मदत केली आहे, व ज्या ज्या थोर लोकांची आमच्या कामास सहानुभूति आहे त्या सर्वांचे आभार न मानतां मीं आपलें भाषण संपविलें तर तें अगदींच अयोग्य होईल असें मला वाटतें. पुणें येथें नामांकित वेदांतभूषण डॉ. खेडकर यांनीं आमच्या पाहुण्यांकरितां आपला बंगला अनेक गैरसोयी सोसून दोन दिवस मोकळा करून दिला त्याबद्दल त्यांचे मी या मंडळातर्फे अत्यंत प्रेमानें आभार मानतों. तसेंच डिप्रेस्डक्लास मिशननें आपला बंगला आमच्या आजच्या व उद्यांच्या कामासाठीं दिल्याबद्दल, यंच

मेन्स ख्रिश्चन असोसिएशननें आम्हांस लागणारें त्यांचेकडील सामान दिल्याबद्दल उभय संस्थांचे आभार मानणें आपलें सर्वांचें कर्तव्य आहे व तेंही मी मोठ्या आनंदानें करतों.

मराठा बंधुभगिनींपैकीं मे. पाटीलसाहेब, मे. म्हस्केसाहेब, रा. गाडे, रा. रामराव शिंदे, रा. शिर्के, रा. कर्णेकर, रा. माळवी, रा. काळभोर, रा. शितोळे, श्री. सौ. आनंदीबाई शिर्के वगैरे मंडळींनीं मला या परिषदेच्या कामीं फारच मदत केली आहे, इतकेंच नव्हे तर या मंडळाच्या कमिटीस या मंडळींच्या मदती-च्या अभावीं ही परिषद् या तऱ्हेनें भरवून आणणें अत्यंत कठिण गेलें असतें असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होईल असें मला वाटत नाहीं.

श्रीमन्महाराज सरकार सयाजीराव गायकवाड समशेर बहादूर, श्रीमंत आबासाहेब फडके, चीफ आफ जत, यांच्याकडून व इतर कांहीं गैरहजर असलेल्या अनेक गृहस्थांकडून आम्हांस सहानुभूतिपर पत्रें आलेलीं आहेत.

श्रीमंत खासेसाहेब पवार, या मंडळाचे अध्यक्ष यांना स्वतः हजर रहातां येत नसल्यामुळें त्यांची दिलगिरीप्रदर्शक तार आलेली आहे. मे. खासेरावसाहेब जाधव, ज्यांच्या अभावीं आपणां सर्वांना आज येथें अगदीं उघडें उघडें दिसत आहे, त्यांना आज अत्यंत जरुरीच्या सरकारी कामामुळें हजर राहतां आलें नाहीं याबद्दल त्यांचें दिलगिरीदर्शक पत्र आलें आहे. मे. खासेरावसाहेब जाधव हे जरी येथें प्रत्यक्ष हजर नाहींत, तरी गेले दोन आठवडे बहुधा दररोज मला त्यांचीं पत्रें येत आहेत व त्यांच्या वेळोवेळीं आलेल्या सूचनांप्रमाणें मी येथें काम करीत आहें. इतकेंच सांगितलें म्ह-णजे मे. खासेरावसाहेब जाधव यांची या परिषदेसंबंधाची दृढ कळकळ आपल्या नजरेस चांगली येईल.

आमचे आजचे अध्यक्ष मे. माधवराव साहेब शितोळे बी. ए. बॅरिस्टर ॲट लॉ, एम्. आर्. ए. सी. यांनीं आमच्या मंडळाची विनंति मान्य करून अध्यक्षस्थान सुशोभित केलें आहे याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानीत आहें.

नंतर रा. विठ्ठल रामजी शिंदे बी. ए. यांचें पर्यालोचनात्मक भाषण झालें तें येणें प्रमाणें:—

" अध्यक्ष महाराज आणि बंधुभगिनींनो, आजचा प्रसंग पाहून त्याच्याविषयीं कांहीं पूर्वग्रहाच्या जोरावर वरवर विचार करणारांचा एक सकृद्दर्शनींच मोठा गैरसमज होण्याचा संभव आहे. तो हा कीं, आजची ही लहानशी परिषद् म्हणजे एक जातपंचायतच आहे, कारण तिच्यांत एकाच विशिष्ट जातीचीं माणसें जमलीं आहेत. असा गैरसमज इतरांहून स्वतः मराठ्यांनाच अधिक होण्याचा संभव आहे, हें हां आम्ही जाणून असलें पाहिजे. असला गैरसमज शक्य तितक्या नेटानें दूर करण्यासाठीं इतिहास आणि वाङ्मय ह्या दोन मुख्य तत्त्वांच्या लक्षणाविषयीं आपल्या भावना निश्चित केल्या पाहिजेत. कोणत्याही देशाचा इतिहास म्हणजे त्याच्या कर्तृत्वाचा पुरावा आणि वाङ्मय म्हणजे त्याच्या मनोविकारांचा पुरावा; ही ठोकळ लक्षणें तूर्त आमच्यापुढें ठेवलीं तरी देखील आमचा कार्यभाग होणार आहे. ह्या दृष्टीनें पाहतां देशाच्या इतिहासाचा व वाङ्मयाचा कोणता, कितीसा व कसाकसा भाग, देशांत राहणाऱ्या निरनिराळ्या संघटित समाजांच्या वांट्यास येतो ह्या गोष्टीचा विचार त्या समाजांनीं पृथक् पृथक् करीत राहिल्यानें समवायानें सर्व देशाचा व विशेषतः त्या त्या समाजाचा फायदा आहे कीं नाहीं ही गोष्ट प्रथम आपण पाहिली पाहिजे. असा जर फायदा दोन्ही बाजूंनीं होत असला तर आजची परिषदही केवळ एक जातपंचायत नसून ती एक राष्ट्रसेवा आहे हें स्पष्ट होत आहे. आम्ही तर स्वतः असा सर्वदेशीय फायदा होतो अशा दृढ समजुतीनें व श्रद्धेनेंच ह्या कार्याला लागलों आहों. देशाचें कर्तृत्व म्हणजे त्यांतील निरनिराळ्या समाजांनीं केलेले श्रम, अशा व्यापक दृष्टीनें पाहतां सर्व समाजांचा अथवा जातींचा इतिहास अवलोकनीय आहे अशी खात्री पटेल. आतां, इतिहास म्हणजे केवळ लढाया, दंगे, मुलूखगिरी आणि रक्तपात ह्यांचें रसभरित वर्णन असेंच लक्षण कोणास ठरवायाचें असल्यास आमचा नाइलाज आहे. अशा खोट्या लक्षणाच्या इतिहासाची देखील समृद्धि मराठा जातीपाशीं आहे ती गोष्ट निराळी. पण त्याच एकांगी लक्षणाची टिमकी वाजविण्यासाठीं आम्हीं हें काम हातीं घेतलेलें नाहीं, हें स्वतः आम्हीं पक्कें ध्यानांत ठेवलें पाहिजे व इतरांस प्रांजलपणानें कबूल होईल अशा रीतीनें सांगितलें पाहिजे. देशाचें कर्तृत्व म्हणजे त्या देशांतील विशेष जातींनीं विशेष प्रसंगीं गाजवलेलीं वीरश्रीचींच कृत्यें नसून सर्व जातींनीं अविश्रांत दाखविलेले श्रम-

सहिष्णुता, भोगलेलीं दुःखें आणि केलेला नित्य व्यवहारांतला दीर्घोद्योग, ह्या सर्वांचें समवाय स्वरूप नव्हे काय ! मग असा प्रश्नच कोठें राहतों कीं, ह्या कर्तृत्वाचा वाटा अमक्याच जातीकडे आहे आणि अमक्याकडे नाहीं. आणि जर ह्या कर्तृत्वांत सर्वांनाच वाटे आहेत तर मग सर्वांनीं आपापल्या वाट्याकडे निरखून पाहिल्यास कोणाचें अहित होण्याचा संभव राहत नाहीं. उलट अशी पृथक् दृष्टि आणि लय लागल्याशिवाय राष्ट्राचे घटक व्यक्तिशः कर्तृत्वशील, विचारशील व प्रगमनशील होणार नाहींत.

जो प्रकार इतिहासाविषयीं तोच वाङ्मयासही लागू आहे. मानवी मनोविकार हे सर्वसाधारणच असणार. मग त्यांत जातिविशिष्टत्वाचें खूळ कशास पाहिजे असा एक आक्षेप केवळ तर्कदृष्ट्या विचार करणाराकडून येणार ह्यांत शंका नाहीं. ते म्हणतील वाङ्मयाचा जातीशीं काय संबंध ! मीही उलट दिशेनें तोच प्रश्न विचारतों. जो जागा झाला, ज्याला धक्का बसला, ज्याला विचारानें पछाडलें, ज्याला विकारांनीं घेरलें ती व्यक्ति—मग कोणत्याहि जातीची असो—जें जें बोलेल, जें जें उद्गारील, जें जें गाईल तें सर्वच वाङ्मय आणि तेंच खरें राष्ट्रीय वाङ्मय. एरव्हीं गावाळ ग्रंथ अथवा फार तर त्यांची गणना शालोपयोगी ग्रंथांत होईल. मी तर म्हणतें आलों आहे कीं, अगदीं अस्पृश्य आणि टाकाऊ समजलेल्या जातीलाही वाङ्मयाचा अधिकार आहे. आणि तो त्यांनीं दक्षिणहिंदुस्थानांत तामिल तेलगू भाषेंत तसेंच अल्पांशानेंच कां होईना महाराष्ट्रांत मराठी भाषेत आजवर बजावला आहे, ही गोष्ट सर्व जातीच्या संतांनीं केलेल्या कामगिरीवरून स्पष्ट होत आहे.

आतां कोणी म्हणेल, जेथें मासादिक ग्रंथाचा प्रश्न आहे तेथें जातीचा प्रश्न नाहीं तेथें प्रतिभावान् व्यक्तींचाच प्रश्न आहे. प्रतिभेची कधीं वांटणी झालेली नाहीं किंवा तिचे कधीं कोणास ठेके देण्यांत आले नाहींत. पण जेथें सर्व सामान्यग्रंथ लिहिण्याचा प्रश्न आहे तेथें विशिष्ट जातीच ग्रंथ लेखनक्षम आहेत; इतर नाहींत हें वस्तुस्थितीवरून कळण्यासारखें आहे. हें म्हणणें बरोबर असेल. पण लेखन व्यवसाय म्हणजे पोटें भरण्याचा एक धंदा असा अर्थ असेल तर त्याच्याशीं ह्या परिषदेचा कांहीं संबंध नाहीं. ह्या परिषद्

मराठ्यांच्या मानसिक अथवा त्याहून सन्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास त्यांच्या अध्यात्मिक उन्नतीसाठीं आहे. ही उद्योग परिषद् नव्हे. हिच्यांत मराठ्यांनीं छापखाने काढावेत कीं नाहींत, पुस्तकविक्रीचीं दुकानें उघडावीत कीं नाहींत, व्यापारी धोरणाचीं वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें चालवावींत कीं नाहींत असल्या प्रश्नांची चर्चा करावयाची नाहीं. मराठ्यांनीं वाङ्मयसेवा करावी ह्याचा अर्थ मराठ्यांनीं संघटित रीतीनें व जबाबदारीपूर्वक विचार करावयाला लागावें व जन्मभूमीचें ऋण केवळ शेतांत किंवा खंदकांत शरीराचा घाम अथवा रक्त शिंपडून नव्हे, तर अधिक विस्तृत अशा विचारक्षेत्रांत संचार करून मनानें किंबहुना सर्व आत्म्यानें फेडलें पाहिजे असा आहे. त्यांतच त्यांची खरी उन्नति व देशाचें तारण आहे. एकानें प्रासादिक ग्रंथ लिहावे व इतरांनीं त्याचें भक्तिभावें श्रवण करून गुजारा करावा ही समाज परिणतीची जवळजवळ आद्यावस्थाच होय. जग आतां ह्या अवस्थेच्या पुढें बरेंच गेलें आहे. एका राणी मुंगीनें प्रजोत्पादनाचें काम करावें व इतर मुंग्यांनीं वांझ राहून जन्मभर ओझीं वाहावींत ही मुंग्यांची गोष्ट झाली. माणसाची गोष्ट याहून वेगळी आहे. किंवा दुसऱ्या दृष्टीनें विचार केला असतांही श्रमविभागाचें तत्व उद्योग धंद्यांत चांगलें लागू पडतें म्हणून अध्यात्मिक हितसंबंधातही त्याचाच पुरस्कार करणें पढतमूर्खपणाचें होईल.

अशा या प्रयत्नापासून वितुष्ट वाढेल अशी एक भीति सात्विक अंतःकरणाच्या पण कळकळीच्या राष्ट्रभक्तांना वाटण्याचा संभव आहे. कारण 'मन ज चिंती तें वैरी न चिंती' अशी एक म्हण आहे. अशा वंदनीय मित्रांनाही आम्ही भरंवशानें सांगतों कीं, वितुष्ट वाढणें किंवा सलोखा वाढणें हें कोणताही प्रयत्न करणें किंवा न करणें ह्यावर अवलंबून नाहीं, तर विशिष्ट प्रयत्न कोणत्या पद्धतीनें विशेषतः कोणत्या भावनेनें करण्यांत येतील त्यावर अवलंबून आहे. आजवर प्रयत्न झाले नाहींत म्हणून वितुष्ट वाढावयाचें थांबलें आहे थोडेंच. आतां पुढें प्रयत्न होणार त्यांनें सलोखा वाढणार नाहीं असें तरी कां गृहित धरावें ? चिटणिसांनीं आतांच जो रिपोर्ट वाचला व अध्यक्षांनीं जें आश्वासन दिलें त्यावरून आमच्या पूर्वग्रहास जागा रहात नाहीं.

हाता घेतलेलें काम तात्काळ फळ देणारें नाहीं; त्याचा पाया घालण्यालाही कित्येक वर्षे लागतील. हें शिक्षणाचें काम आहे, किंबहुना मार्गदर्शनाचें काम आहे असें म्हटल्यासही अधिक शोभेल. आमच्या प्रयत्नामुळें जरी इतिहास लिहिले गेले नाहींत, पण नुसती ह्या समाजाला ऐतिहासिक दृष्टि आली तरी तूर्त समाधान मानण्यास पुष्कळ अवकाश मिळेल. मराठा तरुणांनीं ह्याच पिढींत पुष्कळसे जरी ग्रंथ निर्माण केले नाहींत, पण त्यांना अन्तःशोध करण्याची भूक लागली, आणि त्यांची स्वतःची दृष्टि हीन स्वार्था-वरची उडून मार्गे पडत चाललेल्या जातीच्या हित संबंधाकडे लागली, व ती तेथेंच मुरून न जातां उन्नत दर्जाचें देशसंरक्षण आणि देशोद्धार ह्या विषयाकडे लागली तरी कार्यभाग झाला च म्हणावयाचा. नुसतें लिहिणं हें साधन, किंबहुना विचार करणें हेंही साधनच आहे. अंतःकरण उदार होणें आणि आत्म्याचें समर्पण होणें हें साध्य होय. तेंच जीवनाचें सार्थक आणि तेंच आमचें ध्येय आहे.

हा घटनेचा काळ आहे. जरी ह्या घडीला चोहोंकडे रणसंग्राम माजलेला आहे आणि जो तो मारीन अगर मरेन असें आवेशतेनें म्हणत आहे, तरी माझ्या मतें हा काळ विग्रहापेक्षां संधीचाच अधिक आहे. युद्धासाठीं देखील अवाढव्य प्रमाणानें घटनाच होऊन राहिली आहे. युद्धाचा हा घडीचा पूर ओसरून जाईल. मागें घटना शिल्लक राहील. ह्यावरून घटनेचें महत्व ध्यानीं येईल. तर सर्व समाजांनीं व जातींनीं प्रगतीच्या सर्व बाजूंनीं घटना जमवून आणणें अवश्य आहे. सर्वांशानें पूर्ण कोणी नाहीं. आपल्या सर्व लाडक्या अटी पूर्ण झाल्याशिवाय पाऊल टाकणार नाहीं हा आग्रह काय कामाचा! लहानसान दोष आड येतील किंवा पुढें उद्भव-तील, तरी ' कां न सदन बांधावें कीं, त्यांत पुढे बिळ करिल घूस ' !"

परिषदेंत मंजूर झालेले ठराव.

### ठराव १ ला

फिरतें संशोधकः—ऐतिहासिक वाङ्मयाचा प्रसार करण्या-साठीं कागदपत्र मिळविणें, लोकमत तयार करणें, वर्गण्या गोळा करणें. ठिकठिकाणीं पोट कमिट्यांची घटना करणें, मंडळासाठीं

सभासद जमविणें हीं आणि इतर अशीं कामें करण्याकरितां व मंडळाचे उद्देश सफल करण्यासाटीं फिरते संशोधक नेमण्याची आवश्यकता आहे. हे संशोधक ग्रॅजुएट, अँडरग्रॅजुएट किंवा निदान अनुभवानें काम करण्यास लायक ठरलेले होतकरू असे मराठा गृहस्थ असावेत. त्यांनीं निदान कमीत कमी दोन वर्षें तरी काम करण्याची हमी घ्यावी. त्यानंतर त्यांच्या आणि मध्यवर्ती कमिटीच्या आवडी निवडी प्रमाणें कामाची मुदत वाढवून पुढें ते मध्यवर्ती दफ्तराचे सभासद होतील अशी तजवीज मध्यवर्ती कमिटीला करणें इष्ट आहे, असें या परिषदेचें मत आहे.

हा ठराव रा. काशिनाथ रामकृष्ण कोरगांवकर, बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं पुढें आणला.

या टरावास रा. रा. एल्. एस्. काटे, बी.ए. एल्.एल्. बी. यांनीं अनुमोदन दिलें.

रा. नारायण भाऊ कर्णेकर यांनीं या ठरावास पुष्टी दिली.

## ठराव २ रा.

**पूर्व तयारीच्या शिष्य वृत्त्याः**--योग्य असे संशोधक मंडळास मिळावेत ह्या उद्देशानें देशांतील निरनिराळ्या कॉलेजांत शिकत असलेल्या मराठा विद्यार्थ्यांना पूर्व तयारी साठीं कांहीं विशेष प्रकारच्या शिष्यवृत्त्या देण्याचे प्रयत्न होणें इष्ट आहे. ठिकठिकाणच्या मराठा समाजाकडून आणि संस्थानांतून व विशेषतः डक्कन असोसिएशन सारख्या संस्थांकडून मराठा विद्यार्थ्यांना हल्लीं शिष्यवृत्त्या देण्यांत येत आहेत. मंडळाच्या मध्यवर्ती कमिटीनें अशा सर्व समाजांशीं आणि संस्थांशीं सहकार्य करून मंडळाचे उद्देश सिद्धीस नेण्याकरितां कांहीं विशेष प्रकारच्या शिष्यवृत्त्या राखून ठेवणें श्रेयस्कर आहे. अशा पूर्वतयारीच्या शिष्यवृत्त्या कॉलेजांतून इतिहास आणि देशी वाङ्मय ऐच्छिक विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांसच देण्यांत याव्या, आणि कॉलेजांतील त्यांचा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर ते निदान दोन वर्षें तरी मंडळातर्फे फिरते संशोधक म्हणून काम करतील अशी त्यांचेकडून लेखी हमी घ्यावी; आणि त्यांच्या अध्ययनाच्या प्रगतीचा रिपोर्ट त्यांच्या कॉलेजांतील इतिहासाच्या अध्यापकाकडून मंडळाच्या सेक्रेटरीकडे दर तिमाहीस

यावा, अशी कांहीं तजवीज करण्यांत यावी, असें या परिषदेचें मत आहे.

हा ठराव रा. पांडुरंग चिमणाजी पाटील, एल्. एजी. यांनीं पुढें आणला. रा. धर्माजीराव रोकडे, जे.पी. यांनीं या ठरावास अनुमोदन दिलें.

रा. रामराव गोविंदराव शिंदे, बी. ए. यांनीं या ठरावास पुष्टी दिली.

## ठराव ३ रा.

**मध्यवर्ती दफ्तर (Central Bureau) आणि फंड:**— कामाचा पूर्ण अनुभव घेऊन मंडळाचें काम आजन्म करण्यास जे फिरते संशोधक तयार होतील, त्यांच्या चालकत्वाखालीं एक मध्यवर्ती दफ्तर आणि फंड असावा. असे योग्य चालक मिळेतोंपर्यंत मध्यवर्ती दफ्तर हल्लींच्या मुख्य कमिटीच्या चालकत्वाखालींच स्थापण्यांत यावें, व मंडळाच्या माहितीपत्रकांत प्रसिद्ध केल्याप्रमाणें त्याची घटना पुणें शहरीं करण्यांत यावी, असें या परिषदेचें मत आहे.

हा ठराव रा. कृष्णराव अर्जुनराव केळुसकर यांनीं पुढें आणला. प्रथमतः पुढील आशयाचें त्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. आपले मराठा संस्थानिक जे आहेत, त्यांच्याकडे इतिहासाचें कागदपत्र खूप असल्यानें आपलें पहिलें काम म्हणजे संस्थानिकांना जागृत करून त्यांपाशीं असलेलीं दफ्तरें धुंडाळणें हें होय. यासंबंधीं आपण स्वतः कोल्हापुरास खटपट केली होती, परंतु त्यांत आपणास यश आलें नाहीं, वगैरे आपला अनुभव रा. केळुसकरांनीं सांगितला. रा. राजवाड्यांसारखा स्वार्थत्यागी माणूस आपण मिळविला पाहिजे, न मिळाल्यास पगारी माणसें इतिहास संशोधनाचे कामीं उपयोगी पडतील. या कामीं फार वर्षें घालवावयास नकोत, पांच वर्षें पुरेत. आपण तर दोन वर्षांत पुरें करूं असेंही ते म्हणाले. फिरत्या संशोधकांच्या कर्तव्यासंबंधानें बोलतांना त्यांनीं सांगितलें कीं, या संशोधकांनीं चुका काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे व जुने लेख शोधण्याची पराकाष्ठा केली पाहिजे. तसेंच त्यांनीं सूचिपत्रही तयार केलें पाहिजे.

नंतर थोडें मध्यवर्ती दफ्तरासंबंधानें ते बोलले.

या ठरावास रा. गोविंदराव सातणे यांनीं दुजोरा दिला व रा. अनंतराव गवंडी यांनीं त्यास पुष्टी दिली.

## ठराव ४ था.

प्रांतकमिट्या:—इतऱ्हेनें मंडळाचे उद्देश सिद्धीस नेण्याकरितां प्रांतांच्या आणि भाषेच्या सोयीप्रमाणें मध्यवर्ती कमिटीच्या हाताखालीं काम करण्याकरितां स्वतंत्र अशा निरनिराळ्या भागांमध्यें पोटकमिट्या नेमणें जरूर आहे. त्यांना प्रांतकमिट्या असें म्हणतां येईल. प्रांतकमिट्यांनीं आपापल्या प्रांतामध्यें मिळालेले कागद आणि इतर माहिती मध्यवर्ती दफ्तराच्या उपयोगासाठीं आणि मिळालेल्या वर्गण्या कामाच्या साधारण हिशासाठीं पुढील तजवीज होईपर्यंत आपापल्या ठिकाणींच ठेवण्यास हरकत नाहीं. फिरते संशोधक त्या त्या प्रांतांमध्यें कामासाठीं गेले असतांना त्यांना सर्व प्रकारें मदत देणें हें प्रांतकमिट्यांचें काम आहे. अशा प्रांतकमिट्या निरनिराळ्या प्रांतांतून मराठ्यांची पुरेशी संख्या असलेल्या मोठमोठया शहरीं नेमण्यांत याव्यात, असें या परिषदेचें मत आहे.

वरील ठराव रा. निळकंठराव देशमुख यांनीं पुढें आणला.

या ठरावास अनुमोदन देतांना, रा. लक्ष्मण बापूजी शिंदे, बी. एजी. हे म्हणाले, स्थानिक कमिट्यांची स्थापना न करतां स्वतंत्रपणें प्रयत्न करून माहिती मिळविणें फार कठीण; व पूर्ण माहिती मिळविण्यास त्या त्या ठिकाणचा माहितगार मनुष्य पाहिजे; याकरितां कमिट्यांची स्थापना अवश्य आहे. कमिट्यांतील सभासद इतिहास व वाङ्मय यांची अभिरुचि असणारे असेच असावेत. निदान ज्यांना या विषयांची सहानुभूति आहे असे तरी पाहिजेत. फक्त पुढारी या दृष्टीनें सभासद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. फिरत्या संशोधकांना अशा कमिट्यांची फार मदत होणार आहे.

## ठराव ५ वा.

वृत्तपत्र:—मंडळाच्या आश्रयाखालीं पैशाच्या आणि काम करणारांच्या सवडीप्रमाणें एक वृत्तपत्र असावें, असें या परिषदेचें मत आहे.

हा ठराव रा. भगवंतराव पाळेकर यांनीं पुढें आणला, व मंडळाच्या आश्रयाखालीं एक वृत्तपत्र निघालें तर त्याची उपयुक्तता किती तरी होईल याचें त्यांनीं थोडक्यांत विवेचन केलें.

रा. गणपतराव काळे यांनीं या ठरावास अनुमोदन दिलें.

या ठरावावर रा. रावबा थोरात यांनीं अशी उपसूचना आणिली कीं, वृत्तपत्र सुरूं करावयाचें काम फार खर्चाचें असल्यानें सध्यां चालू असलेल्या वृत्तपत्रांतच इतिहाससंशोधनाची माहिती देण्याकरितां जागा राखून ठेवण्याची तजवीज व्हावी.

## ठराव ६ वा.

**समाजाची सहकारिताः**—ऐतिहासिक आणि इतर वाङ्मयाच्या प्रसारार्थ वर सांगितलेल्या आणि इतर निरनिराळ्या योजना अमलांत आणण्यासाठीं चालूं असलेल्या ठिकठिकाणच्या मराठा संस्थांशीं ह्या मंडळाची सहकारिता असावी, असें या परिषदेचें मत आहे.

रा. रामचंद्रराव वंडेकर यांनीं हा ठराव पुढें आणला.

रा. लक्ष्मणराव ठोसर यांनीं या ठरावास अनुमोदन दिलें.

रा. त्र्यंबक हरी आवटे यांनीं या ठरावास पुष्टी दिली.

## ठराव ७ वा.

**परिषदेची पुनरावृत्तिः**--ऐतिहासिक आणि इतर वाङ्मयाच्या प्रसारासाठीं मराठा जातींतील आणि त्यांच्या हितचिंतक अशा तज्ज्ञ विद्वानांनीं वेळोवेळीं जमून परस्परांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा एकमेकांस देणें श्रेयस्कर आहे. म्हणून अशा परिषदेची बैठक दरसाल होणें इष्ट आहे, आणि ही बैठक आणि मराठा शिक्षणपरिषदेची बैठक यांमध्यें पांच सहा महिन्यांचें अंतर ठेवून मंडळीला सोयस्कर अशा रीतीनें परिषद भरविण्याची योजना करावी, व ती होतां होईल तों पुण्यासारख्या मध्यवर्ती ठिकाणीं भरवावी असें या परिषदेचें मत आहे.

श्री. सौ. आनंदीबाई शिर्के यांनीं हा ठराव पुढें आणला व परिषदेच्या पुनरावृत्तीची उपयुक्तता थोडक्यांत मुद्देसूद रीतीनें सांगितली.

रा. बापूराव बच्याजी शिंदे यांनीं या ठरावास अनुमोदन दिलें. ह्यासंबंधानें मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, दरसाल मराठा शिक्षणपरिषदेचे वेळीं व बैठकीचे जागीं एकादा दुसरा दिवस घेऊन ही परिषद् भरविली असतां पुष्कळ सद्गृहस्थांचा लाभ या परिषदेस अनायासेंच होईल, व ऐतिहासिक वाङ्मयाची रुचि व सद्वासना हीं जास्त वाढतील. शिवाय दूरदूरच्या ठिकाणांहून येणाऱ्या कार्यकर्त्या लोकांना त्यांच्या वेळेच्या बाजूनें सुखावह होईल असें वाटतें; परंतु दोन्ही परिषदेंत ६ महिन्यांचें अंतर असावें व ठिकाण पुणेंच असावें असें ज्याअर्थी नमूद केलें आहे त्याअर्थी त्यासंबंधीं पूर्ण विचार झाला असेल असें वाटतें. तरी पण ऐतिहासिक परिषद् ही गर्भावस्था व बाल्यावस्था यांतून पुढें येईपर्यंत स्थलकालाचें सांनिध्य असणें बरें.

रा. भी. ब. माळवी व रा. मा. रा. शितोळे यांनीं या ठरावास पुष्टी दिली.

नंतर आभारप्रदर्शन वगैरे झाल्यानंतर ठरल्याप्रमाणें त्या दिवसाचा कार्यक्रम आटोपला.

---

## दिवस दुसरा.

### रविवार ता. २७ मे १९१७ इ. स.

कार्यक्रमांत ठरल्याप्रमाणें सकाळीं ८ वाजतां पुणें येथील भा. इ. सं. मंडळाचे प्रतिनिधी व ह्या परिषदेचे सभासद ह्यांची सद्विचारिणी मिश्र बैठक झाली. विचाराकरितां दोन्ही संस्थांचें परस्परसाह्य कसें घडवून आणतां येईल ? हा विषय होता. अध्यक्षस्थानीं मे. जयरामराव जनार्दन सावंत एल्. सी. ई. ई. ई. (जपान) यांची योजना झाल्यावर भा. इ. सं. मंडळाचे चिटणीस रा. रा. दत्तो वामन पोतदार बी. ए. यांनीं त्या संस्थेचा अहवाल सांगितला. त्यांत त्यांनीं त्या मंडळाचे क्षेत्र व व्याप्ती बरीच मोठी

असून केवळ ऐतिहासिक दृष्ट्याच माहिती मिळवावयाची नाहीं तर सर्व प्रकारची जुनी माहिती, जुन्या वस्तु वगैरे गोळा करण्याचे ठरलें आहे; एक वेळ छापलेल्या कागदपत्रांची पुनरावृत्ति होऊं नये येवढ्याकरतां एक सूचिपत्र तयार होत असल्याचे त्यांनीं सांगितलें; रा. रा. राजवाडे व इतर संशोधक यांच्या लेखांचें एकीकरण संघरूपानें केलेलें आहे व मंडळाचा पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलेला संशोधनसंग्रह पहाणेचा असल्यास आपल्यापैकीं कोणी आल्यास दाखवितां येईल असें ते बोलले.

नंतर रा. ब. साने यांनीं म. इ. सा. मंडळ स्थापन झालें ह्मणून आनंद प्रदर्शित केला. त्यांनीं मराठ्यांचा इतिहास व इतर जातींचा इतिहास वेगवेगळा कसा होईल याबद्दल शंका प्रदर्शित करून ब्राह्मण मंडळींना यांत सभासद होतां येईल तर बरें असें सुचविलें.

त्यावर रा. वि. रा शिंदे यांनीं उत्तरादाखल भाषण केलें. ते म्हणाले:—ब्राह्मणवर्ग सुशिक्षित असल्यामुळें आमचे वडील बंधु म्हणण्यास हरकत नाहीं तरी क्षात्रतेजाच्या दृष्टीनें मराठा वर्ग रेसभरही कमी योग्यतेचा नाहीं, तेव्हां त्या वर्गाला स्वतंत्र संस्था असणें वाजवी आहे; आमचें कार्य हें आहे कीं, मराठा जातीच्या सर्व भावनास शिक्षण मिळावें. भा. इ. सं. मंडळाकडे रा. पोतदार म्हणतात त्याप्रमाणें सारस्वत आहे, परंतु मराठ्यांना वाङमय पाहिजे. मराठे लोकांना सभासद होता यावें हें फार विचारानें ठरविलें आहे.

नंतर २ ठराव पास करण्यांत आले, ते:—

**ठराव १:**—दोन्ही संस्थांनीं मिळविलेले कागदपत्र व केलेल्या पुस्तकसंग्रहाचा लाभ परस्परांना मिळेल अशी तजवीज ठेवणें.

( ठराव रा. केळुसकर यांनी पुढें मांडिला. मराठ्यांचा इतिहास मराठ्यांच्या दृष्टीनें शोधावयाचा आहे ब्राह्मणी दृष्टीनें नाहीं असें त्यांनीं सांगितलें.

रा. अनंत विनायक पटवर्धन बी. ए. यांनीं या ठरावास अनुमोदन दिलें.

रा. रा. वझे यांनीं या ठरावास पुष्टी दिली. )

**ठराव २:**—भा. इ. सं. मंडळ व म. इ. सा. मंडळ यांच्या

कमिटींतील मंडळींनीं आपापल्या सवडीप्रमाणें परस्परांना वेळोवेळीं भेटून परस्परांच्या गरजा समजून घेऊन त्या भागविण्यासाठीं काय उपाय योजावे याचा विचार वरचेवर करीत असावें.

( रा. अ. वि. पटवर्धन बी. ए. यांनीं हा ठराव पुढें मांडला. त्यास रा. के. एम्. पवार यांनीं अनुमोदन दिलें. व रा. बापूराव बच्याजी शिंदे यांनीं पुष्टी दिली. )

नंतर अध्यक्षांनीं समारोपादाखल भाषण करून सभेचें काम संपविलें.

कार्यक्रमांत ठरल्याप्रमाणें ता. २७ माहे मे रोजीं दुपारीं ३ वाजतां फर्ग्युसन कॉलेजमधील इतिहासविषयाचे अध्यापक प्रो० लिमये यांचें रा. रा. पांडुरंग चिमणाजी पाटील डेप्यूटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर यांच्या अध्यक्षतेखालीं भाषण झालें. प्रो० लिमये ह्मणालेः—

भारत-इतिहास-संशोधक ही संस्था अस्तित्वांत असतां निराळी जातिविशिष्ट संस्था काढणें राष्ट्राला हितकारक होईल किंवा काय असा प्रश्न पुढें येतो, परंतु वेगवेगळे प्रयत्न झाल्यानें एकंदरींत राष्ट्राचें कार्य होणारच, तरी ते प्रयत्न करितांना राष्ट्रविघातक गोष्टी होतां कामा नयेत.

पूर्वजांचा अभिमान असणें श्रेष्ठ गणलें जातें. म. इ. वा. मंडळ ही संस्था स्थापन करून आपण शौर्यशाली पूर्वजांचे एक शतकानंतर श्राद्धच करीत आहां असें मला वाटतें. मराठेशाहींतील आपल्या अतुल पराक्रमी पूर्वजांचा अभिमान बाळगणें आपलें आद्य कर्तव्य आहे.

मराठेशाही शांत झाल्यानंतर थोड्याच वर्षांत ग्रँटडफ साहेबांचा मराठ्यांचा इतिहास बाहेर पडला. त्यांनीं लिहिलेल्या इतिहासांत आज बऱ्याच चुका दिसून येत आहेत तरी त्याबद्दल त्यांना दोष किंवा शिव्या देऊं नयेत त्यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचा पाया घातला ह्मणून त्यांचे आभारच मानलें पाहिजेत. ह्या साहेबानंतर साने, मोडक, खरे, राजवाडे, पारसनीस वगैरे मंडळी पुढें येऊन नाना तऱ्हेच्या अडचणी सोसून त्यांनीं मराठ्यांच्या इतिहासांचें

साधनें जमविण्याचें कार्य नेटानें चालविलें आहे. त्यांचें काम वंद-नीय आहे. आपल्या मंडळाला मला कांहीं सूचना कराव्याशा वाट-तात. आपल्या योजनेंत कागदपत्रांकरितां अग्निपासून सुरक्षित अशी इमारत मंडळाला असावी असा उल्लेख प्रमुखपणानें केला असल्याचें मला आठवत नाहीं. इमारत नसेल तर संस्थेचें काम बरोबर चालणार नाहीं, कारण कागदपत्रांची फारच जबाबदारी असते. या संस्थेला अगोदर संग्रहालय पाहिजे. तुम्हांला मोठी इमा-रत सध्यां बांधणें अवघड वाटत असेल तर निदान अशी १०।१२ फुटांची तरी एखादी खोली आपले कागदपत्र जतन करून ठेवण्यासाठीं आपल्या मंडळाजवळ पाहिजे.

आपण जो संग्रह कराल त्याच्या खरेपणाची–त्याच्या अस्सल-पणाची–जबाबदारी आपल्यावर राहील. अलीकडे कांहीं महत्त्वाच्या कागदपत्रांच्या अस्सलपणाबद्दल शंका घेण्यांत येत आहेत. स्त्रियांच्या पातिव्रत्याप्रमाणें ऐतिहासिक कागदाचा अस्सलपणा शंकेच्या पलीकडे असला पाहिजे.

कागदपत्रांच्या संपूर्ण याद्या, वर्णानुक्रमानें केलेल्या याद्या, व वर्णनात्मक याद्या ह्यांची अत्यंत जरूर आहे. मराठ्यांच्या ऐतिहासिक साधनांची एक यादी अवश्य तयार असली पाहिजे. परंतु ती अद्याप माझ्या पहाण्यांत आलेली नाहीं. ही गोष्ट संशोधकांना व एकंदर इतिहासाचा अभ्यास करणारांनाही लाजिरवाणी लांछनास्पद आहे. असला दोष आपल्या कामांत राहणार नाहीं अशी खबरदारी आपण पहिल्यापासून घ्याल अशी मला उमेद आहे.

कागदपत्र प्रकाशनाच्या कामीं चिकित्सक बुद्धीला व तारतम्य भावाला जितका वाव मिळेल तितका देऊन उपयोगी कागद छापिले पाहिजेत नाहीं तर उगीच निरुपयोगी कागद छापणें म्हणजे पैशाचा व वेळाचा व्यर्थ व्यय करणें होय असें मला वाटतें. त्याप्रमाणेंच ऐतिहासिक प्रकाशनाच्या कामासंबंधीं सर्व ऐतिहासिक संस्थांचें व तसेंच संशोधकांचें एकीकरण झालें पाहिजे नाहीं तर पुनरावृत्ति होऊन श्रमाचा व पैशाचा व्यय व्यर्थ होत राहील.

प्रस्तावना, उपोद्घात, टिप्पणें वगैरे देऊन साधारण जननेला तुमचे नवीन शोध किंवा लेख सुबोध असावे. तुमचें संशोधन

किल्ले-कुलुपाच्या कडेकोट बंदोबस्तांत न राहतां ते बहुजन समाजाला अगर इतिहासाची गोडी असणाराला खुलें असावें.

आपल्या इतिहासाची कांहीं गोष्टींत बदनामी करणारे परकीय लोक असतात त्यांच्यासाठीं तुमचे शोध जगांत सर्व साधारण चालणाऱ्या इंग्रजी भाषेंतूनही प्रसिद्ध व्हावेत म्हणजे बरेंच कार्य यशस्वी होईल. आपल्या पूर्वजांच्या बदनामीचें निराकरण आपले शोध मराठींत ठेविल्यानें होणार नाहीं, म्हणून अशा कामीं व्यक्तींचा हेका अगर त्यांच्या लहरी उपयोगी नाहींत. मुख्य उद्दिष्टाकडे, पितृकार्य करण्याकडे, त्यांच्या उज्वल कीर्तीला लावण्यांत आलेले काळे डाग धुवून काढण्याकडे, आपल्या कामाचा रोख पाहिजे व ह्या भावनेनेंच आपण कामाला प्रवृत्त झालें पाहिजे. कोणतेंही राष्ट्रहित ह्याच भावनेनें सिद्ध होतें.

आपली संस्था जरी संकुचित स्वरूपाची-सर्व मराठ्यांच्या एका विशिष्ट भागापुरतीच-असली तरी तिचें काम, तिनें योजिलेलें कार्य, संकचित वृत्तीनें चालविण्यांत येणार नाहीं अशी मला आशा आहे राष्ट्रीय भावनेनें-महाराष्ट्रीय भावनेनें-कामाला प्रारंभ झाल्यानंतर तें काम उत्कृष्ट होण्याविषयीं मला शंका वाटत नाहीं.

नंतर सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटींतील डॉ. देव यांनीं भाषण केलें व त्यांनीं मंडळाला उद्देशून असें सांगितलें कीं, मंडळानें लोकांचीं कागदपत्रें जमा केल्यास तीं वेळच्या वेळीं परत करण्यांत तत्पर असावें ह्मणजे लोकांचा गैरसमज होणार नाहीं व इतिहास संशोधनाकरितां स्वतंत्र माणसें मिळविलीं पाहिजेत. अशा माणसाशिवाय तुमचें कार्य मुळींच यशस्वी होणार नाहीं. तरी त्याबद्दल आपण खटपट करावी. प्रथम कागदपत्रें मिळवावींत व नंतर मग इमारत बांधण्याचें काम हातीं घ्यावें. हें मला बरें दिसतें. डॉ. देव यांचें भाषणानंतर रा. साळवी, डॉ. सेडकर, रा. केळुसकर वगैरे वक्त्यांचीं भाषणें झालीं. रा. केळुसकर म्हणाले. आपल्यांतील भावी संशोधकांनीं विद्वान वर्गांतील तज्ज्ञ लोकांकडे शिष्य ह्मणून रहावें, हें भावी कार्यास इष्ट आहे रा. वि. रा. शिंदे यांनीं व्याख्यात्यांना फ. कॉलेजांतील इतिहास ऐच्छिक विषय घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना सहकार्य म्हणून विशेष कांहीं मदत कराल काय म्हणून विनंति केली. तेव्हां प्रो. लिमयांनीं तें आमचें कार्यच आहे त्याबद्दल आपण सहा शब्द घालण्याचें कारण नाहीं. म्हणून सांगितलें.

शेवटीं अध्यक्षांनीं थोडक्यात मुद्देशीर भाषण केलें. ते ह्मणाले:- "पूर्वजांच्या शौर्याची आठवण होऊन कोणास आनंद होणार नाहीं! पूर्वजांनीं आपल्या अंगच्या गुणांनीं मिळविलेल्या कीर्तीवर सकौतुक व स्वाभिमानानें कोण पहाणार नाहीं! पूर्वजांचा इतिहास प्रसिद्ध होणें अत्यंत अवश्य आहे. ग्रँटडफ साहेबांनीं केलेली कामगिरी महत्वाची ठरले कारण आमची कामगिरी आम्हीं केली नाहीं. आमच्याकडे वास्तविक पूर्वजांच्या कामगिरींची जाणीव कमी आहे असे मोठ्या दिलगिरीनें ह्मणावें लागते. आपल्याकडे मोठे योद्धे, मोठे दानशूर, मोठे कवी, मोठे ग्रंथकार, यांचीं चित्रें तुह्मांस कोठें दिसतात काय! युरोपमध्यें पहा प्रत्येक मोठ्या शहरीं म्युझिअममध्यें त्यांचीं चित्रें किंवा पुतळे उभारलेले तुह्मांस सर्वत्रैनें आढळतील. डेन्मार्क आणि जर्मनीमध्यें तर राजवाड्याच्या भिंतीवर व म्युझिअमचे भिंतीवर चित्ररूपीं इतिहास लिहिलेला आहे.

मराठ्यांच्या इतिहाससंशोधनाचें काम बहुधा फारसें अवघड नाहीं. तें काम मराठ्यांची जुनी दफ्तरें, देसाई, देशमुख, राजेरजवाडे वगैरे मंडळींच्या दरबारचे कागद, पोवाडे, भाट वगैरे लोक, जुने किल्ले व इमारती, ह्यावरून होऊं शकेल. या कामीं द्रव्य व माणसें यांची अडचण प्रथम भासेल. वास्तविक द्रव्याची अडचण आह्मांला येऊं नये. आमचा इतिहास म्हणजे महत्वाचा आहे. आमच्यांत धनिक राजेरजवाडे पुष्कळ आहेत त्यांनीं या मंडळाला कां आश्रय देऊं नये! शिवाय आमचे लोक दिलदार आहेत. आमच्या घराण्यांची माहिती मिळाल्यास ते सढळ हातानें मदत करतील. मग आम्हांस फायरप्रूफ घर मिळणें अशक्य नाहीं. आज आमच्यांत माणसें कमी आहेत हीं गोष्ट खरी आहे. पण इकडे विशेष लक्ष पोंचविलें तर आमच्यांत माणसें मिळतील अशी माझी खात्री आहे,व त्यासंबंधीं विचार ठरलाच आहे.

प्रो. लिमये यांनीं सुचविलेल्या गोष्टींविषयीं आपण मन लावून विचार केला पाहिजे. त्यांच्या सूचना अनुभवानें ठरल्या आहेत, त्याकडे आमचे नेहमीं लक्ष राहिले पाहिजे."

व्याख्याते व पाहुणे मंडळींचे आभार मानल्यावर दुपारच्या बैठकीचें काम संपविण्यांत आलें.

# परिशिष्ट अ.

## म. इ. वा. मंडळाच्या नागपूर शाखेचा

## आहवाल.

श्री. व्यंकटराव गुजर ह्यांचे बंगल्यावर ता, १८ मार्च १९१७ इसवी म. इ. वा. मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद श्री. वि. रा. शिंदे, श्री. निळकंठराव देशमुख व नागपूर येथील प्रमुख मराठा गृहस्थ यांची सभा होऊन तेथें ही शाखा स्थापन करण्यांत आली. या शाखेची कार्यकारी मंडळी ठरविण्यांत आली ती खालील-प्रमाणेः—

चेअरमन-श्री. व्यंकटराव नाईक

खजीनदार-,, त्र्यंबकराव गुजर

सभासद्-मे. हणमंतराव मोहिते, मे. शंकरराव भोसले, मे. बापूराव शिंदे व मे. अप्पासाहेब शिरके.

सेक्रेटरी-श्री. व्यंकटराव गुजर व मे. निळकंठराव देशमुख. याच सभेंत खालील ठराव पास करण्यांत आले.

**ठराव १**—चिटणीसांनीं मध्यवर्ती संस्थेशीं पत्रव्यवहार करावा जुन्या ऐतिहासिक महत्वाच्या कागदपत्रांचा तपास करून ते जिम्मे-दारीनें नमूद करून ठेवावें, व असलें कागदपत्र नमूद करितांना ज्यांच्या जिम्मेस ते असतील त्यांचे सहीनिशीं ते नमूद करावें.

**ठराव २**—ह्या प्रांतांतील मराठा समाजांतील आस्थेवाईक विद्यार्थ्याला तो पदवीधर झाल्यावर इतिहासाची फेलोशिप देऊन त्याचेकडून संशोधन व संग्रह करून घ्यावा अथवा त्याची शिफारस पोटशाखेनें मुख्य मंडळाकडे करावी.

**ठराव ३**—कार्यकारी मंडळीच्या सभासदांचीं संख्या साताचे वर नसावी.

**ठराव ४**—ह्या संस्थेच्या विद्यमानें नागपूर येथील भ्रातृ-मंडळाच्या सहकारीतेनें ऐतिहासिक विषयावर व्याख्यानमाला चालू करावी.

**ठराव ५**—मे. निळकंठराव देशमुख यांनीं मे. वि. रा. शिंदे यांचे बरोबर जाऊन वऱ्हाड प्रांतीं अशी संस्था स्थापन करावी.

ठराव ६—आजच्या सभेच्या कामाच्या प्रोसिडिंगाची एक नक्कल मध्यवर्ती मंडळाचे सेक्रेटरीकडे पाठवावी.

ठराव ७—श्री. त्र्यंबकराव गुजर ह्यांनीं श्री. कुंवर लक्ष्मणरावसाहेब ह्यांच्या मार्फतीनें श्री. नामदार राजे बहादुर रघोजीराव भोंसले ह्यांना ह्या संस्थेचे अध्यक्ष निवडावें त्यांची कबुली न मिळाल्यास श्री. कुंवर लक्ष्मणराव भोंसले ह्यानाच होण्याविषयीं विनंति करावी.

एकंदर सोळा मराठा गृहस्थांस सभासद करण्यात आले व सभासद वाढविण्याचा अधिकार शाखेकडे ठेवण्यांत आला.

---

## म. इ. वा. मंडळाच्या उमरावती शाखेचा

### आहवाल.

### ( स्थापना—ता. २१ माहे मार्च १९१७. इसवी. )

श्री. माधवराव शंकरराव ऊर्फ आप्पासाहेब देशमुख यांच्या बंगल्यावर श्री. आप्पासाहेब देशमुख, मे. रामराव माधवराव ऊर्फ अण्णासाहेब देशमुख बी. ए. एल्. एल्. बी. बॅरिस्टर ॲट लॉ, मे. हणमंतराव मेघश्यामजी देशमुख बी. ए. एल्. एल्. बी. वकील उमरावती. श्री. रामराव कृष्णराव देशमुख, मे. श्यामराव बापूजी नाझर, मे. जानराव बाजीराव देशमुख, मे. विठ्ठलराव त्रिंबकजी देशमुख. मे. नथू शंकर पाटील. मे. विठ्ठल रामजी शिंदे व मे. निळकंठराव देशमुख वगैरे मंडळींची सभा ता. २१ मार्च १९१७ रोजीं श्री. आप्पासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं झाली सदर सभेंत ठराव पास झाले ते येणेंप्रमाणें.—

( १ ) मंडळाच्या कार्याकरितां तेवीस सभासदांची जनरल कमिटी करण्याचें ठरलें व वरील सभासदांची संख्या वाढविण्याचा अधिकार वऱ्हाडशाखेस ठेवण्यांत आला.

( २ ) कार्यकारी मंडळ ठरविण्यांत आलें तें:—

अध्यक्ष श्री. माधवराव शंकरराव ऊर्फ अप्पासाहेब देशमुख
उपाध्यक्ष „ रामराव कृष्णराव देशमुख

समासद मे. निळकंठराव देशमुख
  ,, बापूराव सोनाजी कुकडे
  काशिराव बापूजी देशमुख
सेक्रेटरी मे. हणमंतराव मेघश्यामजी देशमुख वकील
  ,, विठ्ठल प्रिथमजी देशमुख

म. इ. वा. मंडळाच्या मध्यवर्ती संस्थेशीं चिटणीसांनीं पत्रव्यवहार करून अवश्य ती माहिती मिळवावी व द्यावी. असेंही ठरलें.

( ३ ) समजलेल्या माहितीवरून असें कळतें कीं, वऱ्हाड प्रांतांतील प्रत्येक लोक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या कचेरींत जुने कागद पत्राचीं अनरजिष्टर दफ्तरें आहेत. तेव्हां ह्या सभेच्या कार्यकारी मंडळींनीं ह्या प्रांतांतील जिल्ह्याच्या मुख्याधिकाऱ्याकडून ती पाहण्यास परवानगी मिळवावी. दफ्तरें तपासतांना ऐतिहासिक उपयोगी कागदपत्राची याद व टांचण करावें.

( ४ ) तपासून मिळविलेल्या कागदपत्राचा संग्रह ज्या प्रांताचा त्या प्रांतांतील कार्यकारी मंडळीजवळ राहील. ज्या गृहस्थाचा कागद तो त्याच्याच जवळ राहील; परंतु खालीलप्रमाणें एक नोंदबुक ठेवून त्यांत तो कागद दर्ज करावा.

| अ. नं. | तारीख | ज्यांच्या ताब्यांत कागद असेल त्यांचें नांव व पत्ता. | कागदाच्या मितीसह संक्षिप्त वर्णन. | कागद आणाराची सही. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|

( ५ ) लाभलेल्या कागदपत्रांचीं वर्गवारी संशोधन वगैरे करण्याकरितां परीक्षेसाठीं इतिहास विषय घेऊन बी. ए. मध्यें उत्तीर्ण झालेल्या लायक मराठा पदवीधराला फेलोशिप द्यावी.

( ६ ) वऱ्हाड म. शि. संस्थेनें एक इतिहास विषय घेऊन शिकणाऱ्या विद्यार्थ्याकरितां तिच्या ठरावापेक्षां पांच रु. अधिक अशी छात्रवृत्ति ठेवावी. व इतिहास विषय घेऊन बी. ए. झाल्यावर त्या विद्यार्थ्यानें फेलोशिप करण्याबद्दल निदान ५ वर्षांपुरता तरी करार करून द्यावा. अशी या मंडळीनें त्या सभेस विनंति करण्याचें ठरलें.

साधनें जमविण्याचें कार्य नेटानें चालविलें आहे. त्यांचें काम वंद-नीय आहे. आपल्या मंडळाला मला कांहीं सूचना कराव्याशा वाट-तात. आपल्या योजनेंत कागदपत्रांकरितां अग्निपासून सुरक्षित अशी इमारत मंडळाला असावी असा उल्लेख प्रमुखपणानें केला असल्याचें मला आठवत नाहीं. इमारत नसेल तर संस्थेचें काम बरोबर चालणार नाहीं, कारण कागदपत्रांची फारच जबाबदारी असते. या संस्थेला अगोदर संग्रहालय पाहिजे. तुह्मांला मोठी इमा-रत सध्यां बांधणें अवघड वाटत असेल तर अग्नीला अदाह्य अशी १०।१२ फुटांची तरी एखादी खोली आपले कागदपत्र जतन करून ठेवण्यासाठीं आपल्या मंडळाजवळ पाहिजे.

आपण जो संग्रह कराल त्याच्या खरेपणाची–त्याच्या अस्सल-पणाची–जबाबदारी आपल्यावर राहील. अलीकडे कांहीं मह-त्वाच्या कागदपत्रांच्या अस्सलपणाबद्दल शंका घेण्यांत येत आहेत. स्त्रियांच्या पातिव्रत्याप्रमाणें ऐतिहासिक कागदाचा अस्सलपणा शंकेच्या पलीकडे असला पाहिजे.

कागदपत्रांच्या संपूर्ण याद्या, वर्णानुक्रमानें केलेल्या याद्या, व वर्णनात्मक याद्या ह्यांची अत्यंत जरूर आहे. मराठ्यांच्या ऐतिहासिक साधनांची एक यादी अवश्य तयार असली पाहिजे. परंतु ती अद्याप माझ्या पहाण्यांत आलेली नाहीं. ही गोष्ट संशोधकांना व एकंदर इतिहासाचा अभ्यास करणारांनाही लांछनास्पद आहे. असला दोष आपल्या कामांत राहणार नाहीं अशी खबरदारी आपण पहिल्यापासून घ्याल अशी मला उमेद आहे.

कागदपत्र प्रकाशनाच्या कामीं चिकित्सक बुद्धीला व तारतम्य भावाला जितका वाव मिळेल तितका देऊन उपयोगी कागद छापिलें पाहिजेत नाहीं तर उगीच निरुपयोगी कागद छापणें म्हणजे पैशाचा व वेळाचा व्यर्थ व्यय करणें होय असें मला वाटतें. त्याप्रमाणेंच ऐतिहासिक प्रकाशनाच्या कामासंबंधीं सर्व ऐतिहासिक संस्थांचें व तसेंच संशोधकांचें एकीकरण झालें पाहिजे नाहीं तर पुनरावृत्ति होऊन श्रमाचा व पैशाचा व्यय व्यर्थ होत राहील.

प्रस्तावना, उपोद्घात, टिप्पणें वगैरे देऊन साधारण जननेला तुमचे नवीन शोध किंवा लेख सुबोध असावे. तुमचें संशोधन

किल्ले-कुलुपाच्या कडेकोट बंदोबस्तांत न राहतां ते बहुजन समाजाला अगर इतिहासाची गोडी असणाराला खुलें असावें.

आपल्या इतिहासाची कांहीं गोष्टींत बदनामी करणारे परकीय लोक असतात त्यांच्यासाठीं तुमचे शोध जगांत सर्व साधारण चालणाऱ्या इंग्रजी भाषेंतूनही प्रसिद्ध व्हावेत म्हणजे बरेच कार्य यशस्वी होईल. आपल्या पूर्वजांच्या बदनामीचें निराकारण आपले शोध मराठींत ठेविल्यानें होणार नाहीं, म्हणून अशा कामीं व्यक्तींचा हेका अगर त्यांच्या लहरी उपयोगी नाहींत. मुख्य उद्दिष्टाकडे, पितृकार्य करण्याकडे, त्यांच्या उज्वल कीर्तीला लावण्यांत आलेले काळे डाग धुवून काढण्याकडे, आपल्या कामाचा रोख पाहिजे व ह्या भावनेनेंच आपण कामाला प्रवृत्त झालें पाहिजे. कोणतेंही राष्ट्रहित ह्याच भावनेनें सिद्ध होतें.

आपली संस्था जरी संकुचित स्वरूपाची-सर्व मराठ्यांच्या एका विशिष्ट भागापुरतीच-असली तरी तिचें काम, तिनें योजिलेलें कार्य, संकुचित वृत्तीनें चालविण्यांत येणार नाहीं अशी मला आशा आहे राष्ट्रीय भावनेनें-महाराष्ट्रीय भावनेनें-कामाला प्रारंभ झाल्यानंतर तें काम उत्कृष्ट होण्याविषयीं मला शंका वाटत नाहीं.

नंतर सर्व्हंट्स ऑफ् इंडिया सोसायटींतील डॉ. देव यांनीं भाषण केलें व त्यांनीं मंडळाला उद्देशून असें सांगितलें कीं, मंडळानें लोकांचीं कागदपत्रें जमा केल्यास तीं वेळच्या वेळीं परत करण्यांत तत्पर असावें ह्मणजे लोकांचा गैरसमज होणार नाहीं व इतिहास संशोधनाकरितां स्वतंत्र माणसें मिळविलीं पाहिजेत. अशा माणसाशिवाय तुमचें कार्य मुळींच यशस्वी होणार नाहीं. तरी त्याबद्दल आपण खटपट करावी. प्रथम कागदपत्रें मिळवावीत व नंतर मग इमारत बांधण्याचें काम हातीं घ्यावें. हें मला बरें दिसतें. डॉ. देव यांचें भाषणानंतर रा. साळवी, डॉ. खेडकर, रा. केळुसकर वगैरे वक्त्यांचीं भाषणें झालीं. रा. केळुसकर म्हणाले, आपल्यांतील भावी संशोधकांनीं विद्वान वर्गांतील तज्ज्ञ लोकांकडे शिष्य ह्मणून रहावें, हें भावी कार्यास इष्ट आहे रा. वि. रा. शिंदे यांनीं व्याख्यात्यांना फ. कॉलेजांतील इतिहास ऐच्छिक विषय घेणाऱ्या मराठा विद्यार्थ्यांना सहकार्य म्हणून विशेष कांहीं मदत कराल काय म्हणून विनंति केली. तेव्हां प्रो. लिमयांनीं तें आमचें कार्यच आहे त्याबद्दल आपण सहा शब्द घालण्याचें कारण नाहीं. म्हणून सांगितलें.

शेवटीं अध्यक्षांनीं थोडक्यात मुद्देशीर भाषण केलें. ते ह्मणाले:- "पूर्वजांच्या शौर्याची आठवण होऊन कोणास आनंद होणार नाहीं! पूर्वजांनीं आपल्या अंगच्या गुणांनीं मिळविलेल्या कीर्तीवर सकौतुक व स्वाभिमानानें कोण पहाणार नाहीं! पूर्वजांचा इतिहास प्रसिद्ध होणें अत्यंत अवश्य आहे: ग्रँटडफ साहेबांनीं केलेली कामगिरी महत्वाची ठरते कारण आमची कामगिरी आम्हीं केली नाहीं. आमच्याकडे वास्तविक पूर्वजांच्या कामगिरीची जाणीव कमी आहे असे मोठ्या दिलगिरीनें ह्मणावें लागते. आपल्याकडे मोठे योद्धे, मोठे दानशूर, मोठे कवी, मोठे ग्रंथकार, यांचीं चित्रें तुह्मांस कोठें दिसतात काय! युरोपमध्यें पहा प्रत्येक मोठ्या शहरीं म्युझिअममध्यें त्यांचीं चित्रें किंवा पुतळे उभारलेले तुह्मांस खात्रीनें आढळतील. डेन्मार्क आणि जर्मनीमध्यें तर राजवाड्याच्या भिंतीवर व म्युझिअमचे भिंतीवर चित्ररूपी इतिहास लिहिलेला आहे.

मराठ्यांच्या इतिहाससंशोधनाचें काम बहुधा फारसें अवघड नाहीं. तें काम मराठ्यांची जुनी दफ्तरें, देसाई, देशमुख, राजेरजवाडे वगैरे मंडळींच्या दरबारचे कागद, पोवाडे, भाट वगैरे लोक, जुने किल्ले व इमारती, ह्यावरून होऊं शकेल. या कामीं द्रव्य व माणसें यांची अडचण प्रथम भासेल. वास्तविक द्रव्याची अडचण आह्मांला येऊं नये. आमचा इतिहास म्हणजे महत्वाचा आहे. आमच्यांत धनिक राजेरजवाडे पुष्कळ आहेत त्यांनीं या मंडळाला कां आश्रय देऊं नये! शिवाय आमचे लोक दिलदार आहेत. आमच्या घराण्यांची माहिती मिळाल्यास ते सढळ हातानें मदत करतील. मग आम्हांस फायरप्रुफ घर मिळणें अशक्य नाहीं. आज आमच्यांत माणसें कमी आहेत ही गोष्ट खरी आहे. पण इकडे विशेष लक्ष पोंचविलें तर आमच्यांत माणसें मिळतील अशी माझी खात्री आहे;व त्यासंबंधीं विचार ठरलाच आहे.

प्रो. लिमये यांनीं सुचविलेल्या गोष्टींविषयीं आपण मन लावून विचार केला पाहिजे. त्यांच्या सूचना अनुभवानें ठरल्या आहेत, त्याकडे आमचे नेहमीं लक्ष राहिले पाहिजे."

व्याख्याते व पाहुणे मंडळींचे आभार मानल्यावर दुपारच्या बैठकीचें काम संपविण्यात आलें.

# परिशिष्ट अ.

## म. इ. वा. मंडळाच्या नागपूर शाखेचा

## आहवाल.

श्री. व्यंकटराव गुजर ह्यांचे बंगल्यावर ता, १८ मार्च १९१७ इसवी म. इ. वा. मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद श्री. वि. रा. शिंदे, श्री. निळकंठराव देशमुख व नागपूर येथील प्रमुख मराठा गृहस्थ यांची सभा होऊन तेथें ही शाखा स्थापन करण्यांत आली. या शाखेची कार्यकारी मंडळी ठरविण्यांत आली ती खालील-प्रमाणें:—

चेअरमन-श्री. व्यंकटराव नाईक
खजीनदार-,, त्र्यंबकराव गुजर
सभासद-मे. हणमंतराव मोहिते, मे. शंकरराव भोसले, मे. बापूराव शिंदे व मे. अप्पासाहेब शिरके.

सेक्रेटरी-श्री. व्यंकटराव गुजर व मे. निळकंठराव देशमुख. याच सभेंत खालील ठराव पास करण्यांत आले.

**ठराव १**—चिटणीसांनीं मध्यवर्ती संस्थेशीं पत्रव्यवहार करावा जुन्या ऐतिहासिक महत्वाच्या कागदपत्रांचा तपास करून ते जिम्मेदारीनें नमूद करून ठेवावें, व असलें कागदपत्र नमूद करितांना ज्यांच्या जिम्मेस ते असतील त्यांचे सहीनिशीं ते नमूद करावें.

**ठराव २**—ह्या प्रांतातील मराठा समाजांतील आस्थेवाईक विद्यार्थ्याला तो पदवीधर झाल्यावर इतिहासाची फेलोशिप देऊन त्याचेकडून संशोधन व संग्रह करून घ्यावा अथवा त्याची शिफारस पोटशाखेनें मुख्य मंडळाकडे करावी.

**ठराव ३**—कार्यकारी मंडळीच्या सभासदांची संख्या साताचे वर नसावी.

**ठराव ४**—ह्या संस्थेच्या विद्यमानें नागपूर येथील भ्रातृमंडळाच्या सहकारीतेनें ऐतिहासिक विषयावर व्याख्यानमाला चालू करावी.

**ठराव ५**—मे. निळकंठराव देशमुख यांनीं मे. वि. रा. शिंदे यांचे बरोबर जाऊन वऱ्हाड प्रांतीं अशी संस्था स्थापन करावी.

ठराव ६—आजच्या सभेच्या कामाच्या प्रोसिडिंगाची एक नक्कल मध्यवर्ती मंडळाचे सेक्रेटरीकडे पाठवावी.

ठराव ७—श्री. व्यंकटराव गुजर ह्यांनीं श्री. कुंवर लक्ष्मणरावसाहेब ह्यांच्या मार्फतीनें श्री. नामदार राजे बहादुर रघोजीराव भोंसले ह्यांना ह्या संस्थेने अध्यक्ष निवडावें त्यांची कबुली न मिळाल्यास श्री. कुंवर लक्ष्मणराव भोंसले ह्यानाच होण्याविषयीं विनंति करावी.

एकंदर सोळा मराठा गृहस्थांस सभासद करण्यांत आले व सभासद वाढविण्याचा अधिकार शाखेकडे ठेवण्यांत आला.

---

## म. इ. वा. मंडळाच्या उमरावती शाखेचा

### आहवाल.

### ( स्थापना—ता. २१ माहे मार्च १९१७. इसवी. )

श्री. माधवराव शंकरराव ऊर्फ आप्पासाहेब देशमुख यांच्या बंगल्यावर श्री. आप्पासाहेब देशमुख, मे. रामराव माधवराव ऊर्फ अण्णासाहेब देशमुख बी. ए. एल्. एल्. बी. बॅरिस्टर ॲट लॉ, मे. हुणमंतराव मेघश्यामजी देशमुख बी. ए. एल्. एल्. बी. वकील उमरावती. श्री. रामराव कृष्णराव देशमुख, मे. श्यामराव बापूजी नाझर, मे. जानराव बाजीराव देशमुख, मे. विठ्ठलराव भिषमजी देशमुख. मे. नथु शंकर पाटील. मे. विठ्ठल रामजी शिंदे व मे. निळकंठराव देशमुख वगैरे मंडळींची सभा ता. २१ मार्च १९१७ रोजीं श्री. आप्पासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं झाली सदर सभेंत ठराव पास झाले ते येणेप्रमाणें.—

( १ ) मंडळाच्या कार्याकरितां तेवीस सभासदांची जनरल कमिटी करण्याचें ठरलें व वरील सभासदांची संख्या वाढविण्याचा अधिकार वऱ्हाडशाखेस ठेवण्यांत आला.

( २ ) कार्यकारी मंडळ ठरविण्यांत आलें तें:—

अध्यक्ष श्री. माधवराव शंकरराव ऊर्फ अप्पासाहेब देशमुख
उपाध्यक्ष „ रामराव कृष्णराव देशमुख

समासद मे. निळकंठराव देशमुख
„ बापूराव सोनाजी कुकडे
काशिराव बापूजी देशमुख
सेक्रेटरी मे. हणमंतराव मेघश्यामजी देशमुख वकील
„ विठ्ठल भिमजी देशमुख

म. इ. वा. मंडळाच्या मध्यवर्ती संस्थेशीं चिटणीसांनीं पत्र-व्यवहार करून अवश्य ती माहिती मिळवावी व द्यावी. असेंही ठरलें.

( ३ ) समजलेल्या माहितीवरून असें कळतें कीं, वऱ्हाड प्रांतां-तील प्रत्येक लोक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या कचेरींत जुने कागद् पत्राची अनरजिश्टर दफ्तरें आहेत. तेव्हां ह्या सभेच्या कार्यकारी मंडळींनीं ह्या प्रांतांतील जिल्ह्याच्या मुख्याधिकाऱ्याकडून ती पाह-ण्यास परवानगी मिळवावी. दफ्तरें तपासतांना ऐतिहासिक उप-योगी कागदपत्राची याद व टांचण करावें.

( ४ ) तपासून मिळविलेल्या कागदपत्राचा संग्रह ज्या प्रांताचा त्या प्रांतांतील कार्यकारी मंडळीजवळ राहील. ज्या गृहस्थाचा कागद् तो त्याच्याच जवळ राहील; परंतु खालीलप्रमाणें एक नोंद-बुक ठेवून त्यांत तो कागद् दर्ज करावा.

| अ. नं. | तारीख | ज्यांच्या ताब्यांत कागद् असेल त्यांचें नांव व पत्ता. | कागदाच्या मितीसह संक्षिप्त वर्णन. | कागद अणाराची सही. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|

( ५ ) लाभलेल्या कागदपत्रांची वर्गवारी संशोधन वगैरे कर-ण्याकरितां परीक्षेसाठीं इतिहास विषय घेऊन बी. ए. मध्यें उत्तीर्ण झालेल्या लायक मराठा पदवीधराला फेलोशिप द्यावी.

( ६ ) वऱ्हाड म. शि. संस्थेनें एक इतिहास विषय घेऊन शिक-णाऱ्या विद्यार्थ्याकरितां तिच्या ठरावापेक्षां पांच रु. अधिक अशी छात्रवृत्ति ठेवावी. व इतिहास विषय घेऊन बी. ए. झाल्यावर त्या विद्यार्थ्यानें फेलोशिप करण्याबद्दल निदान ५ वर्षांपुरता तरी करार करून द्यावा. अशी या मंडळीनें त्या सभेस विनंति करण्याचें ठरलें.

# म. इं. वा. मंडळाच्या मुंबई शाखेचा

## आहवाल.

स्थापनाः—पुणें येथील कमिटीच्या कांहीं सभासदांच्या सल्ल्यानें ता. १ जुलै १९१७ रोजीं या शाखेची स्थापना करण्यांत आली. सदर शाखेच्या स्थापनेसाठीं भरलेली सभा श्री. का. रा. कोरेगांवकर बी. ए. एल्. एल्. बी; जे. पी. हायकोर्ट वकील, यांच्या अध्यक्षतेखालीं झाली.

अध्यक्ष, श्री. वि. रा. शिंदे, श्री. कृ. अ. केळुसकर, श्री. दा. सां. यंदे, श्री. गो. दा. दळवी, श्री. ध. मा. रोकडे, जे. पी, श्री. रा. कृ. दळवी यांचीं उपयुक्त भाषणें झालीं व ठराव झाले ते येणेंप्रमाणें:—

**ठराव १ लाः**—म. इं. वा. मंडळाच्या पुणें येथें मे महिन्यांत भरलेल्या परिषदेंत पास झालेल्या ठरावांतील उद्देशानुसार मंडळाचें उद्दिष्ट साधण्यासाठीं मुंबई येथें मुंबई बेटाकरितां मंडळाची एक शाखा सुरू करण्यांत येत आहे.

**ठराव २ राः**—पहिल्या वर्षाकरितां खालील पांच इसमांची कार्यकारी कमिटी नेमण्यांत येत आहे,व त्यांतील शेवटच्या दोघांस सेक्रेटरी नेमण्यांत येत आहे,

१ श्री. काशिनाथ रामकृष्ण कोरगांवकर, बी. ए. एल्. एल्. बी.·जे· पी.
२ ,, गणपतराव गोडाजी काळे,
३ ,, रामचंद्र भाऊराव दळवी,
४ ,, गोपाळ दाजीबा दळवी,
५ ,, शिवराम सखारामराव शिंदे, बी. ए.

**ठराव ३ राः**—आजच्या सभेला आमंत्रण पाठविलेले व हजर असलेले गृहस्थ यांची मुंबई येथील जनरल कमिटी नेमण्यांत येत आहे व या कमिटींत दुसरे योग्य इसम दाखल करण्याचा अधिकार कार्यकारी कमिटीला देण्यांत येत आहे.

**ठराव ४ थाः**—पुणें येथील म. इं. वा. मंडळाच्या सेक्रेटरी-कडे हे ठराव तेथील कमिटीच्या संमतीकरितां पाठविण्यांत यावे.

( शेवटच्या ठरावाप्रमाणें सर्व ठराव पुण्याच्या कमिटीकडे पाठविण्यांत आले व त्यांस जरूर ती संमति मिळाली आहे.

## झालेलें काम.

**चर्चा:**—गेल्या आगष्ट महिन्यांत श्री. वि. रा. शिंदे, बी. ए. यांच्या ग्रांटरोडवरील ' परेरा बिल्डिंग ' मधील जागेंत मराठाशिक्षणपरिषदेच्या कार्यासंबंधीं चर्चा करण्याकरितां निवडक मंडळींची सभा परिषदेच्या सेक्रेटरीनीं बोलाविली होती. त्या वेळीं मंडळासंबंधही बरीच चर्चा झाली. तींत असें ठरलें कीं,मंडळातर्फे इतिहाससंबंधानें व्याख्यानमाला सुरू करावी; व मंडळांत मुंबईतील सर्व मराठ्यांचा हळू हळू समावेश करावा.

चर्चेत हजर मंडळी:—१ श्रीमंत खासेसाहेब महाराज पवार, (देवास धाकटी पाती,) २ श्री. निळकंठराव देशमुख, जॉ. सेक्रेटरी म. शि. परिषद, ३ श्री. रामचंद्रराव वंडेकर, जनरल सेक्रेटरी, म. शि. परिषद, ४ श्री. वि. रा. शिंदे,बी.ए., ५ श्री. के. कृ. साळवी, ६ श्री. शि. रा. शिर्के सेक्रेटरी, म. इ. वा. मंडळ, मुंबईशाखा.

**व्याख्यान पहिलें:**—वर्ध्याचे श्रीयुत निळकंठराव देशमुख, म. शि. परिषदेचे जॉ. सेक्रेटरी, यांचे ' मराठ्यांच्या इतिहासाची सामुग्री ' या विषयावर गेल्या आगष्ट महिन्यांत वैश्य महाजन वाडांत ' मराठा-ऐक्येच्छु-सभेच्या मदतीनें व्याख्यान करण्यांत आलें. अध्यक्षस्थान श्री. काशिनाथ देवजी धुरू, जे. पी. यांनीं भूषित केलें होतें. व्याख्यात्यांचे भाषणानंतर श्री. वि. रा. शिंदे, बी. ए., श्री. रा. वि. वंडेकर, वगैरे गृहस्थांची भाषणें झालीं.

व्याख्यानमालेखेरीज मंडळाची माहिती देणें, सभासद करून घेणें वगैरे कामें चालू आहेत.

# परिशिष्ट ब.

## म. इ. वा. मंडळाची घटना.

१ संस्थेचें नांव मराठा-इतिहास-वाङ्मयोत्तेजक मंडळ.

२ मंडळाचें मुख्य दप्तर पुणें येथें राहील.

३ मंडळाचे उद्देश येणेंप्रमाणें आहेत:—

( अ ) होतकरू मराठा लेखकाकडून बक्षिसाकरितां वेळोवेळीं ऐतिहासिक व मराठा वर्गास उन्नतीकारक असे निबंध मागविणें.

( ब ) वेगवेगळया निश्चीत ठिकाणीं ऐतिहासिक साधनें गोळा करून तीं योग्य देखरेखीखालीं ठेवणें.

[ क ] मराठ्यांच्या इतिहासासंबंधीं कोणत्याही देशच्या अथवा कोणत्याही जातीच्या उत्तम लेखकाकडून आलेले नवीन व अप्रकाशीत वाङ्मय छापून व प्रसिद्ध करून ऐतिहासिक संशोधनास उत्तेजन देणें.

[ ड ] मध्यवर्ती ऐतिहासिक ग्रंथसंग्रहालय स्थापन करणें.

[ ई ] ज्याच्या योगानें मराठा वर्गांत वाङ्मयाची अभिरुची वाढेल असे कोणतेही उपाय योजणें.

४ कार्यकारी मंडळ:–१ अध्यक्ष, १ उपाध्यक्ष, १ खजीनदार, १ सभासद व २ चिटणीस याप्रमाणें असावेत.

५ मंडळाचा सभासद मराठा जातीचा असावा.

६ मंडळाच्या सभासदांपैकीं कोणत्याही एका सभासदानें सूचना व एका सभासदानें अनुमोदन दिल्याखेरीज व ती सूचना कार्यकारी मंडळांत बहुमतानें मंजूर झाल्याखेरीज कोणासही सभासद होता येत नाहीं.

७ सभासदांचे वर्ग:—

मंडळास रुपये एक हजार अगर त्याहून ज्यास्त देणारे आश्रयदाते होत.

रुपये दीडशें अगर त्याहून ज्यास्त रकम मंडळास देणारे लाइफयात सभासद होत.

मंडळास सालीना बारा रुपयेप्रमाणें वर्गणी देणार वर्ग १ चे सभासद.

मंडळास सालीना सहा रु. प्रमाणें देणारे वर्ग २ चे सभासद.

मंडळास सालीना तीन रु. प्रमाणें देणारे वर्ग ३ चे सभासद.

घटनेचा बाकीचा भाग मंजूर व्हावयाचा आहे.

# परिशिष्ट क.

## म. इ. वा. मंडळाचे खजीनदार श्रीमंत सरदार बाबासाहेब घोरपडे, अमीर-उल-उमराव, वडोदें यांचेकडील जमाखर्च.

| जमा. | | नांवें. | |
|---|---|---|---|
| ५२३-१-० | फंडखातें. | ५-१०-९ | पोष्टखर्च खातें. |
| १८-०-० | अनामत खातें. | ०-७-० | सुरवातीस यादीवरहुकुम रक्कम आली त्यावरहुकूमखर्च. |
| ५४२-१-० | | २-८-० | सदर फंडाचे सेक्रेटरी रा. रा. गो. ह. साळवी यांजकडेस रु. २५० ची मनीआर्डर पाठविली त्याबद्दल पोष्टेज. |
| | | २-११-९ | फंडाची रक्कम पाठविण्याबद्दल वर्गणीदाराकडेस उघराणीबद्दल कार्डे पाठविलीं त्याबद्दल पोष्टेज तिकिटें. |
| | | ५-१०-९. | |

४४१-०-० तसलमात फंडाचे, सेक्रेटरी रा. रा. गो. ह. साळवी यांचेकडेस तसलमात रकम आहे ती.
२५० मनीऑर्डरींनीं पाठविलें.
ता ५।७।१७
९१ वर्गणीची रकम बरोबर त्यांचेकडेस आली ती. इसमवार फंडखातें जमा करून नांवें लिहिलें.
ता. २६-५-१७

४४१ वें पत्राप्रमाणें.
३-०-० दफ्तरखर्च खातें उगराणीचीं कार्डे छापविलीं त्याजबद्दल.

४४६-१०-९ एकूण.
९६२-६-३ बाकी शिल्लक रोख.

५४२-१-०

सदरीं वर लिहिल्याप्रमाणें जमाखर्च आहे ता. १२-११-१७.

नरसिंगराव घोरपडे, खजीनदार.

सदरहू हिशोब आज रोजीं कीर्दीशीं मेळ पेर्ता बरोबर आहे.
ता. १२-११-१७.

वाय. बी. मोहिते.

# परिशिष्ट ड.

## मराठ्यांच्या इतिहासावरील कांहीं निवडक पुस्तकांची यादी.

पुस्तकाचें नांव. मिळण्याचें ठिकाण. कर्ता.

१ ऐतिहासिक लेखसंग्रह--( मिरज ) रा. वा. वा. खरे.
२ भारतवर्ष अंक २४-(सातारा) रावबहादूर द. ब. पारसनीस.
३ मराठ्यांचे पराक्रम--( निर्णयसागर प्रेस ) ,,
४ मुसलमानी अमलांतील मराठे सरदार-,, ,,
५ मराठ्यांचें आरमार- ,, ,,
६ इतिहाससंग्रह मासिक-- ,, ,,
७ सरदारांच्या कैफियती-(रा. मावजी मुंबई) ,, व मावजी.
८ सनदा -,, ,,
९ तहनामे -,, ,,
१० शिवछत्रपतींचें चरित्र भा. २-(विविधज्ञान.)रा. म. रा. चिटणीस.
११ शिवछत्रपतींचें चरित्र-(निर्णयसागर) रा. कृ. अ. केळुसकर.
१२ मराठी रियासत--(बडोदें) रा. गो. स. सरदेसाई.
१३ शिवदिग्विजय- ,,- ,,
१४ शिवप्रताप- ,,- ,,
१५ शिवाजीचीं अद्‌भुत कारस्थानें-(महाड) रा. हरडीकर.
१६ मराठ्यांसंबंधी उद्गार-(निर्णयसागर प्रेस) रा. रा. रा. भागवत.
१७ शिवछत्रपतींचें चरित्र ,, ,,
१८ बायजाबाई शिंदे यांचें चरित्र-,, रावबहादूर द. ब. पारसनीस.
१९ अहल्याबाईचें चरित्र-(विविधज्ञानविस्तार) पुरुषोत्तम.
२० पुणेंशहर वर्णन-(पुणें) रा. गायकवाड.
२१ महाराष्ट्रांतील किल्ले भा. २- ,, रा. गोगटे.
२२ नाना आणि महादजी-(आर्यभूषण प्रेस) प्रो. भानु.
२३ मराठ्यांच्या गोष्टी- ,, ,,
२४ मुलांचा महाराष्ट्र-(लोकशिक्षण) रा. मोडक.

२५ थोरले सयाजीराव महाराज
गायकवाड यांचें चरित्र भाग१-(बडोदें) रा. अं. ना. भागवत.
२६ मराठ्यांच्या मर्दुमकी व चरित्रें वगैरे-(किताबखाना पुणें)धनूर्धारी.
२७ मराठामित्र भाग ३-( मुंबई ) रा. गो. दा. दुळवी.
२८ जाधवांचें चरित्र-( बडोदें )
२९ शिंदे घराण्याचा इतिहास-( पुणें ) सरंजामे.
३० भोंसल्यांचा इतिहास-( सातारा ) भिडे.
३१ सावंतवाडी संस्थानचा इतिहास-( पुणें ) रा. पिंगळकर.
३२ मराठयांचे पोंवाडे आ. १-(पुणें चित्रशाळा)आकवर्थ व शालिग्राम.
३३ ऐतिहासिक व इतर पोंवाड्यांचा संग्रह-( कोल्हापूर )
३४ थोरले शाहुमहाराज यांचें चरित्र-(पुणें) रा. गोगटे.
३५ मल्हारराव होळकरांचें चरित्र-( निर्णयसागर ) रा. अत्रे.
३६ कोल्हापूरचा इतिहास-( कोल्हापूर ) रा. मोडक.
३७ फाळके घराण्याची कैफियत
३८ भा. इ. सं. मंडळाचे अहवाल-( पुणें )
इतिवृत्तें व संमेलन वृत्तें
३९ शकावली -( पुणें ) रा. सरंजामे.
४० महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग-(सरस्वतिमंदिर) ना. कृ. गद्रे.
४१ राजवाड्यांचे खंड २०-(पुणें, भा. इ. सं. मंडळ)रा. राजवाडे.
४२ निवाड पत्रें -( रा. मावजी, मुंबई ) रा. मावजी.
४३ ऐतिहासिक गोष्टी भा. ३-(निर्णयसागर) गो. ह. देशमुख.
४४ व्हि. एस.चे मार्मिक ऐतिहासिक
लेख, गुच्छ १-( जगद्धितेच्छु ) रा. जोशी.
४५ क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व-(रा. टोसर, पुणें) रा. बिर्जे.
४६ Who are the Marathas-( „ ) „
४७ मराठयांची शहाण्णव कुळी ( „ ) „
४८ महादजी शिंदे -( पुणें ) रा. नाईक, वकील.
४९ Early History of the Deccan-(„)डॉ. भांडारकर.
५० दख्खनचा जुना इतिहास (भाषांतर) -( „ ) भांडारकर.
५१ Rise of the Maratha power- रा. रानडे.
५२ ब्रिटिश राज्याचा अभ्युदय रा. कर्वे.

# परिशिष्ट इ.

## चिटणीस रा. साळवी यांचेकडील जमाखर्च.

### तेरीज १ जानेवारी ते ३० नवंबर १९१७.

| जमा. | | खर्च. | |
|---|---|---|---|
| ० | शिल्लक. | २१८६८३ | टपालखर्च. |
| १५० | वर्गणीपैकी श्री. बाबासाहेब घोरपडे खजीनदार यांचेकडून. | ७८१२ | कागदपत्र खर्च. |
| | | ११४८८८६ | परिषद् खर्च. |
| | | ३१८१२ | छापणावळ. |
| १२१ | परभारें सेक्रेटरी यांचेकडे जमा. | ४० | नोकर खर्च. |
| | | २७८८ | पुस्तकें व डेडस्टॉक. |
| ३७१ | | २६२८१४८९ | बेरीज. |
| | | १०८८१८३ | शिल्लक. |
| | | ३७१ | एकूण. |

एकूण तीनशें एकाहत्तर रुपये फक्त.

१०।११।१९१७ गोविंद हरबाराव साळवी.

से. म. इ. वा. मंडळ, पुणें.

तपासलें, बरोबर आहे. ता. ११।१२।१७.

सं. के. दुदुसकर.

हिशेबतपासनीस,

म. इ. वा. मंडळ, पुणें.

---

# कार्यकारी मंडळ.

—:०:—

अध्यक्ष—श्रीमंत खासेसाहेब पवार, देवास-धाकटी पाती.

उपाध्यक्ष—मे. खासेरावसाहेब जाधव, बडोदें. एम्.आर्.ए.सी.

खजीनदार—श्रीमंत सरदार नरसिंगराव राजे घोरपडे, अमीर उल उमराव, बडोदें.

सभासद—१ मे. रामचंद्रराव ऊर्फ भाऊसाहेब गायकवाड, कोल्हापूर.

२ मे. बाजीरावसाहेब काटे, ग्वाल्हेर.

३ मे. निळकंठराव देशमुख, वर्धा.

४ मे. गोपाळ दाजीबा दळवी, मुंबई.

५ मे. विठ्ठल रामजी शिंदे, बी. ए., पुणें.

६ मे. पांडुरंग चिमणाजी पाटीळ, एल्.एजी., पुणें.

चिटणीस—१ रा. गोविंद्राव हरबाराव साळवी, बी.ए., एल. एल्. बी., पुणें.

२ रा. केशवराव बापूजी शिंदे, पुणें.

# बक्षीस रुपये दीडशें.

" मराठा जातीच्या लोकांची गेल्या चारशें वर्षांतील राजकीय, सामाजिक, व आर्थिक स्थिति " या विषयावर सर्वांत उत्तम निबंध लिहिणारास रुपये दीडशें बक्षीस दिले जातील.

निबंधाबद्दल अटी:—

१ निबंध रॉयल अष्टपेजी पायका टाईप १२ फॉर्मपेक्षां कमी नसावा.

२ लेखक मराठा जातीचा असला पाहिजे.

३ निबंध खालीं सही करणार यांजकडे ता. ३० जून १९१८ पर्यंत पोंचला पाहिजे. वरील अटींसंबधीं कांहींही विशेष खुलासा पाहिजे असल्यास तो खालीं सही करणार यांचेकडून घ्यावा.

| पत्ता | |
|---|---|
| १९७ बुधवार पुणें. | गो. ह. साळवी, |
| म. इ. वा. मंडळ ऑफिस. | सेक्रेटरी म. इ. वा. मंडळ, पुणें. |

